करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.अॅड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

वर्ष 31 वे

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com |



आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
9822058106



रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.९९ | पाने-२० | दि.२१/१०/२०२२ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.



॥ श्री कोटलिंग प्रसन्न ॥
मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी..!
शिवम स्टिल अॅन्ड सिमेंट एजन्सी
टी.एम.टी.बार चे अधिकृत विक्रेते
Authorized Dealer
प्रोप्रा : अमोल बबन ढवळे (9850125561, 9423339966)
खडी, क्रशसॅण्ड योग्य दरात मिळेल
पत्ता : नगर-सोलापूर बायपास रोड, करमाळा.
आयकॉन स्टीलचे अधिकृत विक्रेते


# तालुक्यात १८१ टक्के पाऊस - सर्व तलाव हाऊसफुल - शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान

करमाळा : करमाळा तालुक्यात प्रचंड पाऊस झाला असून गेल्या अनेकवर्षाचे रेकॉर्ड मोडले आहे. तालुक्याचा सरासरी पाऊस ५१५ मिलीमिटर असतो तर यावर्षी २१ ऑक्टोबर पर्यंत ९३२.९ मिलीमीटर पाऊस म्हणजे १८१ टक्के पाऊस पडला आहे. तालुक्यातील जवळपास सर्वच तलाव शंभर टक्के पेक्षा जास्त भरले असून, बहुतांश तलावाचे सांडवे वाहत आहेत. सीना, कान्होळा या नद्यासह गावपातळीवरचे ओढे हे भरभरून वाहत आहेत. या पावसात शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले असून कांदा, मिरची, टोमॅटो यासह सर्व भाज्या व रब्बीतील ज्वारी पाण्याखाली गेली आहेत. एवढेच नाहीतर केळी सारखी पिकेही पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्याचे फार मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतात चारा असूनही जनावरांना व शेळ्यांना चारा मिळत नाही; अशी कठीण स्थिती निर्माण झाली आहे. करमाळा तालुक्यातील सर्व तलाव शंभर टक्के भरले आहेत.

मांगी, वडशिवणे, म्हसेवाडी अशा तलावातून जोरदार सांडवे वाहत आहेत. या पावसात मांजरगाव ते उमरड या दरम्यानच्या ओढ्यावरील पुल वाहून गेला असून या भागातील वाहतूक काहीकाळ बंद होती. तसेच अंजनडोह ते उमरड या रस्त्यावरीलही पुल वाहून गेल्याने हाही रस्ता बंद होता. करमाळा-केम रस्त्यावरील पांडओढ्याला सातत्याने पुर येत असल्याने अनेकवेळा या रस्त्यावरील वाहतूक बंद झाली. एवढेच नाहीतर एक कामगारही या ओढ्यातून वाहून गेला आहे. तालुक्यातील बहुतांशी महत्वाचे रस्ते या पावासाने खराब झाले आहेत. पिकाची स्थिती अतिशय खराब झाली असून भाजीपाल्यासह रब्बीतील ज्वारीचे पिक वाया गेले आहे. दुसऱ्या बाजुला शेतातील मजूर व बिगारी कामगार यांना गेल्या एक महिन्यापासून काम मिळत नसल्याने त्यांची उपासमार सुरू आहे. ऐन दिवाळीच्या सणाच्या वेळी त्यांना या कठीण प्रसंगास सामोरे जावे लागत आहे. याप्रमाणेच ऊसतोडीच्या मजुराचीही अशीच कठीण स्थिती झाली आहे. तालुक्यातून प्राथमिक स्वरूपात जवळपास १७ हजार हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ शेतकऱ्याच्या पिकाचे पंचनामे करून प्रतिहेक्टरी १ लाख रुपये अनुदान द्यावे; अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. सवलतीच्या दरात आनंदाचा शिदा ही शासनाची योजना या तालुक्यात (पान ६ वर)

| गाव | सरासरी पाऊस | पडलेला पाऊस |
|---|---|---|
| अर्जुननगर | ५१५ मिमी | ९४४.६ मिमी |
| केम | ५१५ मिमी | ८१०.८ मिमी |
| जेऊर | ५१५ मिमी | १२१६.३ मिमी |
| सालसे | ५१५ मिमी | ८७८.१ मिमी |
| कोर्टी | ५१५ मिमी | ८८१.२ मिमी |
| उमरड | ५१५ मिमी | ११२२.३ मिमी |
| केत्तूर | ५१५ मिमी | ८८८.२ मिमी |


विश्वासार्ह पात्र ठरलेले वस्त्रदालन..
सयाजी कलेक्शन
आमच्या सर्व ग्राहकांना व हितचिंतकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
दिवाळी खरेदीवर 10% सुट
• सुटींग, शर्टींग
• रेडीमेड गारमेंटस्
• किडस् वेअर
• साडी, ड्रेस मटेरीयल






फ्रेश स्टॉक उपलब्ध
पत्ता
श्री कमलादेवी रोड
करमाळा, जि.सोलापूर
मो.9404692182
व्हरायटीचे कपडे खरेदीसाठी आजच संपर्क साधा...

दिवा नाही तर वात जळते पण जळत्या वातीला अधार दिव्याचाच असतो....!

संपादकीय.................................................

# दिवा भिजला पावसात !

दिवाळीचा सण हा प्रकाशाचा सण म्हणून ओळखला जातो. हा सण म्हणजे अंध:काराला पळवून उजाडेचा उत्सव आहे म्हणूनच म्हटले जाते, की.. या सणाला मिळणारा प्रकाश हा केवळ रस्त्यावर नको तर तो अंत:करणातही पडला पाहिजे. प्रकाशातून उजेड पडतो. उजेड म्हणजे उजळणे आणि उजळणे म्हणजे आहे त्याला चकाकी देणे. कोणतीही असणारी गोष्ट अधीक तेजोमय करणे व गतीमान करणे अथवा शक्तीशाली बनवणे. आपण नेहमी पाहतो.. रात्रीच्यावेळी घरात सर्वत्र वीजेचे दिवे लावलेले असतांना अचानक वीज गेल्यानंतर सर्वत्र अंधार पडतो. पण काही मिनीटातच गेलेली वीज परत आल्यानंतर सर्वत्र उजेडाचा लखलखाट असतो. अंधाराने झाकोळलेली वास्तू प्रकाशाने उजळून निघते. अशा प्रकाराला रूढ अर्थाने 'उजळणे' म्हणतात. असे उजळणे वास्तुचे शक्य आहे पण माणसाच्या मनाचे काय..? जी गोष्ट दिसते तिच्यावर प्रक्रिया करणे, बदल करणे शक्य असते; पण जी गोष्ट दिसतच नाही तिचे काय ? हा खरा प्रश्न आहे.

तशी मन ही संकल्पना आहे. एका अभंगात संत तुकाराम महाराज म्हणतात.., "मन करारे प्रसन्न । सर्व सिध्दीचे कारण । मोक्ष अथवा बंधन। सुख समाधान आणि इच्छा ते ।।" नशीब, भाग्य, मन याबाबी कोणालाही दिसत नाही. अनेक संशोधकांनी संशोधन केले पण शरीरात जसे मेंदू, हृदय, यकृत सापडले तसे मन कोठेही सापडले नाही. आपण अनुभवतो अनेकदा मनावर परिणाम होतो व त्यामुळे शरीराचे चलन वलन बिघडते. डॉक्टरांकडे गेल्यानंतर ते उपचार करतात, पण शरीरावर त्यांना मन कोठेही सापडत नाही. असं कधी होत नाही की डॉक्टर म्हणाले, मनावर शस्त्रक्रिया करावी लागेल, त्याची बायपास करावी लागेल. तसे होत नाही म्हणजेच या शरीरात मनाचे अस्तित्व जाणवत नाही म्हणून मन नाही का..? मनाला मानावेच लागते. नव्हे-नव्हे मनाशिवाय एक क्षणही जगता येत नाही. जशी मन ही शरीराशी निगडीत संकल्पना, तशीच कार्य करून घेण्याची शक्ती याच मनात आहे.

आपण वर्षानुवर्षे आहे त्याच व्यवसायात, त्याच परंपरेत व आहे त्याच सानिध्यात आहोत. त्यामुळे बदल काय याची प्रत्यक्ष अनुभुती येत नाही. बदल करण्यासाठी फिरणे गरजेचे आहे. पुर्वी एक कोडे असायचे "पान का सडले, भाकरी का करपली, घोडा का आडला" उत्तर एकच न फिरवल्यामुळे. त्याप्रमाणे आता सर्वच गोष्टी फिरवण्याची गरज निर्माण झाली आहे. निसर्ग बदलला आहे, बाजारभाव बदलले आहेत, माणसाची अभिरूची बदलली आहे, संशोधनाने जगणे आणि वागणे यात मोठे बदल झाले आहेत. या बदलाबरीबरच आपण बदललो नाहीतर ..? उत्तर आपण स्पर्धेत दिसणार नाही व आज आपण कोठेच दिसत नाहीत, हे वास्तव आहे. आता किती दिवस जुन्या परंपरेतून चालणार आहोत. ज्वारी, लिंबोणी, ऊस आणि साखर कारखाने याच्या बाहेर आपण पडत नाही. छोटे छोटे पण अनेक व्यवसाय हे आपणाला पोषक आहेत व आपण सहज करू शकतो पण आपण त्याकडे लक्ष देत नाही. शेती पर्यटन, टुरीष्ट, संगणकीकरण, दुधाचे पर्यायी उद्योग, छोटी वाहन निर्मिती व विक्री, मोठ्या वाहनाचे पार्ट उत्पादन, वीज निर्मिती, शेती मालावर प्रक्रिया व्यवसाय खुप काही आहे. त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. सतत दुष्काळ आणि सतत अपयश यावर पर्याय निर्माण करण्याची गरज आहे.

यावर्षी बदलत्या निसर्गाची प्रचिती सर्वांना आली आहे. सप्टेंबर महिन्यापर्यंत कसाबसा पडणारा पाऊस यावर्षी चक्क दिवाळी आलीतर रोज पडतोय. तालुक्यातील रब्बीची पीकं आजही पाण्याखालीच असल्याने, ती जळाल्यातच जमा आहेत. अजून पाऊसच उघडला नाही त्यामुळे दुबार पेरणीचा विषय शक्य वाटत नाही. थोडक्यात ओला दुष्काळ पडला हे बरीबरच आहे. पण सध्या जे हाल सुरू आहेत ते मजुरांचे. शेतमजूर, बिगारी काम करणारे मजूरांना गेला एक महिना ना कोणते काम ना कोणती मिळकत. पर्यायाने त्यांना अर्धपोटी रहावे लागत आहे. त्यांची यावर्षीची दिवाळी अंधारातच जात आहे. ऊसतोडीसाठी आलेले ऊस तोड मजूर गेल्या १५ दिवसापासून फक्त बाजरी आणि मिरचीच्या ठेच्यावर दिवस काढत आहेत. मालकाकडून घेतलेल्या उचली गावाकडे राहिल्या. इकडे उचलीवर कारभार सुरू असतो पण कामच नाही, रोजगार नाही तर उचल कोण देणार..? साखर कारखाने बंद असल्याने अनेक प्रकारच्या उलाढाली थांबलेल्या आहेत. केळीचे दर घटवले आहेत. पावसाने केळी पीकावर विपरीत परिणाम झालेले आहेत. लिंबूनीला जादा पाणी लागल्याने हस्त बहार मिळण्याची शक्यता नाही. शेतीबाबत प्रत्येक पीकात नुकसान झाले आहे. शेतात गवताचा खच पडला आहे. रानं कशी नीट करायची ? हा शेतकऱ्यासमोर मोठा प्रश्न आहे. प्रत्येक वर्षी पीक जगवायची कशी ? हा प्रश्न असतो, यावर्षी पीकतर गेलीच पण हे पाणी कसं थोपवायचं ? हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने 'दिवा भिजला पावसात' म्हणण्याची वेळ आली आहे.

दिवाळी हा प्रकाशाचा सण आहे. या प्रकाशाच्या उत्सवात आपण सर्वांनी ठरवलेतर आपण आपले भाग्य उजळू शकतो. संकटावर मात करू शकतो, योग्य नियोजन केले पाहिजे. काटकसर केली पाहिजे, व्यसनाला व फटाक्याला फाटा दिला पाहिजे. उपलब्ध पाणी साठ्याचा नेमका कसा वापर करून घेता येईल, याचे नियोजन केले पाहिजे. सध्या संकट आहे पण त्यावर मात केली पाहिजे. कधी कधी संकटं ही सुध्दा संधी असते, त्याचा शोध केला पाहिजे पण नाउमेद होवून चालणार नाही. दिवाळीचा सण साजरा करण्याची प्रथा ही नरकासुराला मारल्यानंतर आनंद व्यक्त करण्यासाठी सुरू झाली आहे. म्हणजे संकटला गाडूनच दिवाळी साजरी करावी लागते. त्याचप्रकारे यावर्षी निसर्गाच्या संकटाला गाडून दिवाळी साजरी करू या.. दिवाळीच्या सर्वांना लाख लाख हार्दीक शुभेच्छा..!

## खा.नाईकनिंबाळकर यांचा अतिवृष्टीने बाधित झालेल्या केम परिसराचा पाहणी दौरा

करमाळा(सं.प्र.) : खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांनी अतिवृष्टीने बाधित झालेल्या केम परिसराचा पाहणी दौरा केला. यावेळी खासदार नाईकनिंबाळकर यांनी संबंधित सर्व अधिकाऱ्यांना सरसकट पंचनामे करण्याचे आदेश दिले. तसेच शासनाकडे पाठपुरावा करून करमाळा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्यासाठी प्रयत्नशील राहू; असे अश्वासन दिले. यावेळी तहसीलदार समीर माने, भाजपाचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे, सरपंच अजित तळेकर, कृषी अधिकारी वाकडे, भाजपाचे रामा ढाणे, बाळासाहेब कुंभार, अशोक ढेरे, अमोल पवार, सर्व मंडळाचे सर्कल, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच तसेच केम येथील गणेश तळेकर, सागर नागटिळक, धनंजय ताकमोगे, विकास कळसाईत व शेतकरी बांधव उपस्थित होते.

## वांगी नं.३ च्या सरपंच पदी मयुर रोकडे



करमाळा(सं.प्र.) : वांगी नं.३ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी आमदार संजयमामा शिंदे गटाचे मयुर महादेव रोकडे यांची तर उपसरपंच पदी बागल गटाच्या सुवर्णा संतोष कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी सुहास रोकडे, पांडूरंग जाधव, संतोष देशमुख, पै.युवराज रोकडे, शंकर जाधव, चंद्रकांत कदम, सोमनाथ रोकडे, दिनकर रोकडे, अनिल कळसाईत, अर्जुन तकीक, गणेश तळेकर, सुरेश भानवसे, किसन सोनवणे, शिवाजी तळेकर, नागनाथ जाधव, अल्लाउद्दीन तांबाषळी, भारत तावसे, भारत रोकडे, हनुमंत भोईटे, मारूती पांढरमिसे, गणपत कापसे, सचिन दरेकर, यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## मांजरगाव येथे नेत्रतपासणी शिबीर

करमाळा(सं.प्र.) : मांजरगाव येथे श्री टेक आय क्लिनिक सांगली व ग्रा.पं.मांजरगाव यांचे संयुक्त विद्यमाने नेत्र तपासणी शिबीर व अल्प दरात चष्मे वाटप कार्यक्रम संपन्न झाला. या शिबीराचा शुभारंभ गोकुळ आरकिले यांचे हस्ते शिवछत्रपतींच्या प्रतिमा पूजनाने झाला. या शिबीरात ९५ नागरीकांची नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच आवश्यक त्या प्रत्येक रूणास अल्प दरात चष्मे वाटप करण्यात आले. मोतीबिंदूचे शस्त्रक्रियेचे १२ रूग्ण आढळले असून त्यांचेवर श्री टेक आय क्लिनिक सांगली यांचेकडून मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


सर्व प्रिय ग्राहकांना.....
शुभ दिपावली
यश कलेक्शन
YASH COLLECTION
मेन रोड, करमाळा, जि.सोलापूर
YASH SHOPEE
All Types of Metal & Crockery
यश शॉपी
All Type of Metal & Crockery
गुजर गल्ली, करमाळा, जि.सोलापूर
YASH lifestyle
यश लाईफस्टाईल
भगवान महावीर पथ, नातेपुते, जि.सोलापूर

देवी परिवारा तर्फे सर्वांना
दिपावलीच्या..
हार्दिक शुभेच्छा

देवी
प्लायवुड & हार्डवेअर




● प्लायवुड ● हार्डवेअर ●
● सनमायका ● कचन ट्रॉली ●
● फेव्हिकॉल ● वॉल पेपर ●
● वुडन प्लोरिंग ●



घरगुती वापरा साठी आल्युमिनियमची शिडी मिळेल. सर्व साईज मध्ये उपलब्ध.

करमाळा शहरातील एकमेव लॅमिनेट आणि हार्डवेअर चे भव्य शोरुम



विघ्नहर्ता
इंटिरीयर

प्रोप्रा.अभिनव कमलेश देवी
Mo. 9011524252

प्रोप्रा.अभिषेक कमलेश देवी
Mo. 9028075051

मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा, जि.सोलापूर


शुद्ध.. स्वच्छ.. स्वादिष्ट.. नी रुचकर..
हॉटेल चिवटे फॅमिली रेस्टॉरंट
उत्तम प्रकारचे खाद्य पदार्थ व तत्पर सेवेसाठी सदैव सज्ज
महाराष्ट्रीयन,पंजाबी,चायनीज,राईस,स्नॅक्स डिशेस मिळतील
"सच्चे खवय्ये खाणार त्याला चिवटे देणार"
आतापर्यंत दिलेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल आपले मनःपूर्वक धन्यवाद.!
आमच्या असंख्य ग्राहकांना
आपणास व आपल्या परिवारास दिवाळीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा..!
संगोबा रोड,देवीचामाळ करमाळा.
8888147005/9822502700


दिपावलीच्या सर्व ग्राहकांना हार्दिक शुभेच्छा.
भव्य लकी ड्रॉ
happy diwali
BAJAJ FINSERV
न्यु पाटील मोबाईल एजन्सी
सर्व प्रकाराच्या स्मार्ट फोन फायनान्स केले जातील
0 डाऊनपेंमट
कोणताही स्मार्ट फोन खरेदीवर 11000 रु /- पर्यंत हमखास भेटवस्तू व कॅशबॅक मिळेल.
बजाज फायनान्स 2000 रु/- CASHBACK भेटणार.
SAMSUNG
vivo
iPhone
oppo
ONEPLUS
realme
BAJAJ FINSERV
TVS CREDIT
SAMSUNG Finance+
आपले गाव आपले दुकान
डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, बागवान हॉस्पिटल शेजारी,करमाळा
MO.7020376151 / 9881818059

पान १ वरून पुढे...

# तालुक्यात १८१ टक्के पाऊस - सर्व तलाव हाऊसफुल

सुरू केली नाही. सध्याच्या स्थितीत शेतमालाचे भाव पडले असून शेतकऱ्याचा माल येत नसल्याने बाजार समितीतील व्यापारी थंडावले आहेत. एवढेच नाहीतर दिवाळीचा सण असूनही शहरातील व तालुक्यातील बाजारपेठेत गर्दी नाही.

| प्रकल्पाचे नाव | एकूण साठा (द.ल.घ.मी.) | मृत साठा (द.ल.घ.मी.) | सद्यस्थिती (द.ल.घ.मी.) |
|---|---|---|---|
| मांगी | ३०.३९ | ०.१९ | १०० |
| पारेवाडी | ५.१९ | १.१४ | १०० |
| हिंगणी | २.२२ | ०.३६ | १०० |
| राजुरी | २.५२ | ०.४७ | १०० |
| वीट | २.५३ | ०.४८ | १०० |
| नेरले | २.७४ | ०.६४ | १०० |
| म्हसेवाडी | २.०४ | ०.५१ | १०० |
| कुंभेज | १.३२ | ०.२० | १०० |
| कोंढेज | १.१९ | ०.२९ | १०० |
| सांगवी | २.५० | ०.०० | १०० |
| वडशिवणे | ४.३५ | ०.०८ | १०० |
| संगोबा | ३.३० | ०० | १०० |
| पोटेगाव | १.५८ | ०० | १०० |
| तरटगाव | १.४८ | ०० | १०० |

## पूर्व सोगाव खराब रस्ता दुरुस्तीसाठी ग्रामस्थांची एकजुट

# लोकवर्गणीतून रस्ता दुरूस्तीचे काम सुरू

करमाळा (सं.प्र.) : पूर्व सोगाव ते उमरड या चार किलोमीटर रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे नागरीकांसह विद्यार्थ्यांना खड्ड्यातून मार्ग काढून प्रवास करावा लागत आहे. याप्रश्नी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केला, परंतु आश्वासनाशिवाय काहीही मिळाले नाही. या सर्व गोष्टींना कंटाळून आणि शासनाच्या मदतीची वाट न पाहता ग्रामस्थांनी एक लाख रूपये लोकवर्गणी करून रस्त्यालगतची झुडपे काढून मुरूम टाकून खड्डे बुजविण्याचे काम चालू केले आहे. यामुळे ऊस वाहतुकीसह व प्रवासी वाहतूक करण्यासाठी वाहनचालकांचा त्रास कमी व्हायला मदत होणार आहे.

याकामी प्रा.रामदास झोळ, नेमिनाथ सरडे, अतुल गोडगे, ब्रह्मदेव सरडे, ज्ञानेश्वर गोडगे, भाऊसाहेब राखुंडे, रेवण गोडगे, भागवत मांढरे, तानाजी राखुंडे, बापू चोरमले, गणेश चौधरी, धनंजय गोडगे यांचे सहकार्य लाभत आहे.

ओजस हॉस्पिटल
OJS HOSPITAL
AIIOPATHY AYURVED HOMEOPATHY
डॉ.रोहन रामदास कुंभार B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार M.D. कन्सलटींग फिजीशीयन
डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट
✻ वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ ✻ ✻ २४ तास अत्यावश्यक सेवा ✻
डॉ.सौ.सायली मनोज कुंभार M.sc. Biotech, Health & Nutrition आहारतज्ञ
ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार ● हृदयरोग व उच्च रक्तदाब ● मधुमेह ● थायरॉईड ● संधिवात ● पोटाचे आजार ● स्त्रियांचे आजार ● श्वसनसंस्थेचे आजार ● मणक्यांचे व हाडांचे विकार ● मुतखडा ● मुळव्याध ● सौंदर्य समस्या ● त्वचारोग व केशविकार ● आहारविषयक मार्गदर्शन..
उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा) Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत) PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test (गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)
पत्ता : चिवटे बंधू मिठाईवाले यांच्या समोर, घोलप ज्वेलर्सच्या वरच्या मजल्यावर सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. ● संपर्क : मो.9960334005, 9423333950

# दुध उत्पादक शेतकऱ्यांनी सकस दुधच संस्थेकडे द्यावे- गणेश चिवटे

करमाळा(सं.प्र.) : ग्रामीण भागात दुध संस्थाकडे दुध घालणाऱ्या दुध उत्पादकांनी सकस दुधच संस्थेला द्यावे; असे आवाहन नेचर डिलाईट चे तालुका संकलन केंद्राचे प्रमुख व तालुका भाजपा अध्यक्ष गणेश चिवटे यांनी व्यक्त केले.

घोटी येथील संत सावता माळी सहकारी संस्थेच्या २६ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून चिवटे बोलत होते. यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून ग्रामसुधार संस्थेचे अध्यक्ष ॲड.डॉ.बाबूराव हिरडे, प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी मनोज राऊत, नेचरचे पशूसंवर्धन अधिकारी डॉ.सचिन रूपनवर, मुरघास तज्ञ श्रीमंत झाकणे तसेच डॉ.रेवणनाथ पाटील, डॉ.सतीश देवरे, सेल्स मॅनेजर युवराज सातव आदीजण उपस्थित होते. पुढे बोलताना श्री.चिवटे म्हणाले, की दुध हे अमृत आहे. प्रत्येक घरात लहानापासून वृध्दापर्यंत दुध आहारात घेतले जाते. त्यामुळे खाणाऱ्यांना सकस व कसदार दुध गेले पाहिजे व ते दुध आपण घालतो. आपण चांगले दुध दिले तर खाणारा संतुष्ट होतो व त्याचा दुवा आपणाला मिळतो.

यावेळी पशु संवर्धन कसे करावे यावर डॉ.सचिन रूपनवर यांचे तर दुध संकलन कसे वाढवावे यावर सेल्स मॅनेजर युवराज सातव यांचे भाषण झाले. प्रास्ताविक संस्थेचे चेअरमन मोहन मारूती शेंडे यांनी केले. यावेळी त्यांनी दिवाळीमध्ये वार्षिक दुधापोटी १ लिटर दुधामागे २० पैसे बोनस देण्यात येणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संयोजन कृषी पर्यवेक्षक भारत शेंडे, सचिव लक्ष्मण ननवरे, दत्तात्रय थोरात गणेश बदर,गणेश ननवरे, रामचंद्र राऊत, दत्ता शेंडे, अनिल ननवरे यांनी केले. सुत्रसंचलन सचिन खरात यांनी केले.यावेळी मारूती शेंडे, उध्दव शेंडे गुरूजी हे ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते त्यांचे विशेष सत्कार केले. उपस्थितांचे स्वागत ननवनाथ ननवरे, योगेश म्हेत्रे, रमेश दुधे, सचिन कानडे,गणेश बदर,मनोज चिंदे,बळीराम दुधे,रामभाऊ राऊत,सुभाष दुधे, दत्ता शिंदे, बाळासाहेब ननवरे,बापूराव शिंदे यांनी केले.

यावेळी माजी मुख्याध्यापक अरूण ननवरे, मुख्याध्यापक श्री.ढगे, श्री.मोरे, श्री.जाधव यांने सन्मान करण्यात आले.यावेळी संत सावता माळी दुध संस्थेच्यावतीने सभासंदाचा सहपरिवार संपूर्ण पोशाख भेट दिला. `चर डिलाईट संस्थेच्यावतीने चेअरमन मोहनराव शेंडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

> उत्पादनाबरोबरच काटकसर व बचत केलीतरच आपली प्रगती होऊ शकते. केवळ उत्पादन वाढले पाहिजेच पण मिळवलेला पैसा हा खर्च करताना काटकसरीने खर्च केला पाहिजे. प्रतिष्ठेच्या मागे न धावता बचत केली पाहिजे तरच आपली प्रगती होवू शकते. प्रतिष्ठेपायी एका –एका गावात गरजेपेक्षा जास्त म्हणजे शंभर पेक्षा जास्त ट्रॅक्टर खरेदी केले जातात. या शंभर ट्रॅक्टरचे अर्थशास्त्र समजून घेतलेतर एका ट्रॅक्टरला १२ लाख लागतात. म्हणजे अनावश्यक ट्रॅक्टरसाठी १२० कोटी रूपये गुंतवणूक होते. ज्या रकमेत छोटा साखर कारखाना उभा राहू शकतो. अशाच बाबी व्यसनाच्या आहेत. त्यामुळे उत्पादनात वाढ, खर्च काटकसरीचा व व्यसने टाळून बचत करणे गरजेचे आहे.
>
> ...ॲड.डॉ.बाबूराव हिरडे (अध्यक्ष, ग्रामसुधार समिती)

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
फोन.222233, मो.नं.9423222266
उपलब्ध सुविधा...
● मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
● जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
● फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
● सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
● जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
● नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार ● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
डॉ.डी.बी.केमकर (M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स् आमच्याकडे नंबरचे चष्मे व गॉगल्स योग्य दरात मिळतील.
बॅंक ऑफ इंडिया शेजारी, बसस्टॅन्ड समोर, करमाळा. प्रोप्रा : वर्षा गायकवाड मो.९५२७२६८१८१/७७५६८२५८२६

दिवाळी मोबाईल फेस्टीव्हल
ऑफर २० ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर पर्यंत
प्रत्येक स्मार्ट फोन वर हमखास भेटवस्तू आणि जिंका

₹11000 पर्यंत कॅश बॅक
OPPO SAMSUNG VIVO BAJAJ FINSERV TVS CREDIT
संत गजानन मोबाईल
मेनरोड करमाळा

॥ विश्वास हीच परंपरा ॥
आनंद ड्रायफ्रुटस्
प्रोप्रा : अमोल र. हिरण
मो.9270496867, 7057258385
स्वादीष्ट व चविष्ट उपवासाचे पदार्थ मिळण्याचे ठिकाण !
होलसेल व रिटेल विक्रेते...
ड्रायफ्रुटस्, नमकीन, उपवास पदार्थ मुखवास, बेकरी, लोणचे, आईस्क्रीम चटणी मसाले
खास दिपावलीसाठी उत्कृष्ट प्रतीचा...
सुका मेवा, गिफ्ट बॉक्सेस, ड्रायफ्रुटस् गिफ्ट बॉक्सेस, हलदीराम गिफ्ट बॉक्सेस, चॉकलेट गिफ्ट बॉक्सेस मिळतील

संपर्क एच.यु.गुगळे कापड दुकाना समोर, मेनरोड, करमाळा.

# दत्तकला मधील विद्यार्थ्यांची NEET, JEE, CET परीक्षेत गरूड झेप



करमाळा(सं.प्र.): दत्तकला शिक्षण संस्था संचलित दत्तकला इंटरनॅशनल स्कूल अॅन्ड ज्युनियर कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी NEET, JEE, CET परीक्षेत गुरूड झेप घेतली असून या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव संस्थेचे अध्यक्ष रामदास झोळ व सचिव माया झोळ यांचे हस्ते करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा.रामदास झोळ म्हणाले, की यशाबरोबर अपयश पचवण्याची ताकद विद्यार्थ्यांमध्ये असावी. जिद्द, चिकाटी, मेहनत करण्याची तयारी विद्यार्थ्यांकडे असेलतर नक्कीच त्यांना यश मिळते

यावेळी दत्तकला ग्रुप ऑफ स्कुलच्या डायरेक्टर सौ.ताटे, प्राचार्या यादव, इन्चार्ज खाडे मॅडम, धेंडे सर व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. **नीट परीक्षेत यश मिळविलेले विद्यार्थी :** शार्दुल हारके, हर्ष राजपुत, प्रज्योत साबळे, मानसी श्रीपती, अमृता इंगोले, सार्थक पाटील, सिध्देश चौधर, अश्विन मांडन, नभन्या झरगड, निखिल वाघ, वेदांत नाचन, गौरी काळखैरे, श्वेता बर्गे, विश्वजीत हिंगमिरे, सौरभ शिर्के, प्रांजली ढाले, हर्षवर्धन कोडे.

# भारत जाधव यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

करमाळा(सं.प्र.) : घोटी येथील रहिवासी असलेले व वडशिवणे येथील अजितदादा पवार विद्यालयाचे शिक्षक भारत रोहीदास जाधव यांना मुख्याध्यापक संघा तर्फे दिला जात असलेला जिल्हास्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला आहे. सोलापूर येथील हुतात्मा स्मृती भवन मध्ये या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण उपसंचालकउकीरडे, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी बाबर, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी लोहार, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुभाषराव माने हे उपस्थित होते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तसेच अप्रगत विद्यार्थ्यांना निवडून त्यांना विशेष मार्गदर्शन, ज्ञानेश्वरी वर चिंतन, शालेय विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लावणे असे उपक्रम राबवल्यामुळे भारत जाधव यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

मिळालेल्या पुरस्काराबद्दल वडशिवणे येथील अजितदादा पवार विद्यालय संस्थेचे अध्यक्ष/सचिव मारूती पारखे व मुख्याध्यापक भिमराव भोसले, संत सावता माळी दुध संस्थेचे चेअरमन मोहनराव शेंडे व ग्रामस्थांनी भारत जाधव यांचे विशेष अभिनंदन केले.

# वांगी नं.२ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी पूजा चौधरी

करमाळा(सं.प्र.) : वांगी नं.२ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी पाटील गटाच्या सर्वात तरूण ग्रामपंचायत सदस्या पूजा सतीश चौधरी यांची तर उपसरपंच पदी बशीर खुदूबुद्दीन पटेल यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वांगीचे विभाजन होऊन नूतन ग्रामपंचायत निवडणूका होऊन निकाल लागले. तसेच यात माजी आमदार नारायण पाटील गटाचे ५ सदस्य निवडून आले. आजअखेर वांगी नं.२ ग्रामपंचायतीवर पाटील गटाचीच सत्ता स्थापन झाली. पाटील गटाच्या महिला सदस्या पूजा चौधरी झाल्या असून विशेष म्हणजे वयाच्या २१ व्या वर्षी सरपंच झालेल्या त्या करमाळा तालुक्यातील एकमेव सरपंच आहेत. उपसरपंच पदी बशीर पटेल यांची निवड झाली.

शिवश्री क्लिनिक
डे केअर सेंटर
डॉ.आशुतोष पोपट कापले
B.H.M.S.(M.U.H.S.) Nasik
जनरल फिजीशियन अॅन्ड होमिओपॅथिक कन्सल्टन्सी
मो.9860982072

उपलब्ध सुविधा...
- अॅडमिट करण्याची सुविधा.
- ई.सी.जी. सुविधा
- बालरूग्णांसाठी वाफेची सुविधा

२४ तास अत्यावश्यक सुविधा
- वेळ : सकाळी ११ ते रात्री १०

आमची वैशिष्ट्ये....
- सर्व आजारांवर अॅलोपॅथिक, होमिओपॅथिक उपचार.
- मुळव्याध, त्वचा विकार उपचार.
- मानसिक आजारांवर उपचार.
- नपुसंगतेवरील उपचार.
- आहारासंबधी योग्य मार्गदर्शन.
- मशीनव्दारे रक्तातील शुगर(BSL) व Blood Precesure तपासणी व उपचार.
- जुनाट मधुमेहातील जखम व संधिवात विकारांवर उपचार

टीप भारतीय सैन्य दलातील जवानांची तपासणी फी घेतली जाणार नाही.

अहमदनगर येथील प्रसिध्द किडनीविकार तज्ञ
डॉ.आनंद काशिद (मुत्रविकार तज्ञ, लैंगिक विकार तज्ञ व किडनी ट्रान्सप्लान्ट सर्जन)
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी, करमाळा येथे
ओपीडी वेळ सकाळी १० ते १.००

पत्ता : सचिन मेडिकल समोर, B.M. कॉम्प्लेक्स, दत्तपेठ, करमाळा.

घर विकणे आहे
७०५ स्क्वे.फूट जागा, १००० स्क्वे.फूट बांधकाम (नवीन)
असलेले दोन मजली घर त्वरीत विकणे आहे
संपर्क : मो.9404299029 / 9665915177

# अतिवृष्टीमुळे बाधित केळी पिकांसह सर्व पिकांचे पंचनामे सरसकट करा

## राजेरावरंभा शेतकरी प्रोड्यूसर कंपनीचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

करमाळा (सं.प्र.) : करमाळा तालुक्यात ऑक्टोबर महिन्याच्या प्रारंभीच सरासरीपेक्षा अधिक पाऊस झालेला आहे. सध्या कृषी विभागाकडून अतिवृष्टीने बाधित झालेल्या पिकांचे पंचनामे सुरु आहेत. परंतू त्यामध्ये केळी पिकाचा समावेश केलेला नाही. म्हणून राजेरावरंभा शेतकरी प्रोड्यूसर कंपनी लि; करमाळा यांनी जिल्हाधिकारी यांना केळी पिकासह सर्व पिकांचे पंचनामे सरसकट करणेबाबत निवेदन दिलेले आहे.निवेदनामध्ये म्हटले आहे, की ऑक्टोबर महिन्यातील पहिल्या व दुसऱ्या आठवड्यामध्ये करमाळा तालुक्यातील केळी उत्पादक पट्ट्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झालेली आहे. या अतिवृष्टीने बाधित असलेल्या पिकांचे सध्या पंचनामे सुरू आहे. परंतू या पंचनाम्यामध्ये १ ते सव्वा महिना पर्यंत वय असलेल्या केळी बागांचे पंचनामे केले जात असल्याचे निदर्शनास आलेले आहे. तालुक्यातील सर्व केळी बागांना पाणी लागल्यामुळे सर्रास केळी पिकांची मुळ कुजू लागलेली आहेत. त्यामुळे बागेमध्ये करपा, शिगा टोका, तांबोरा, गडावरील पिटिंग रोग व बुरशीजन्य रोग इ. चा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव वाढलेला आहे. अतिपावसामुळे तालुक्यातील निर्यातक्षम केळी आता कवडीमोल दराने द्यावी लागणार आहे. प्रत्यक्षात पावसामुळे केळी पिकाचे ५० ते ९० टक्के पर्यंत नुकसान झालेले आहे. तरी तालुक्यातील सर्व केळी बागांचे पंचनामे सरसकट करून केळी उत्पादक शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने न्याय द्यावा व संबंधितांना योग्य ते आदेश द्यावे; असे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिलेले आहे.

## महेश चिवटे यांची उद्योगमंत्री यांच्याकडे मागणी

# एमआयडीसी मधील भूखंडाचे दर कमी करून वाटप सुरू करावे

करमाळा(सं.प्र.) : एमआयडीसी मधील भूखंडाचे दर सोलापूर एमआयडीसी पेक्षा जास्त असून हे दर कमी करून तात्काळ भूखंडाचे वाटप सुरू करावे; अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे, की करमाळा एमआयडीसी मध्ये झालेल्या मुलभूत सुविधा विषयी माहिती दिली. करमाळा एमआयडीसी विकसित करण्यासाठी उजनी धरणावरून किंवा सीना कोळगाव प्रकल्पामधून स्वतंत्र पाईपलाईनच्या माध्यमातून पाणी २४ तास उपलब्ध करून द्यावे तसेच उपलब्ध असलेल्या भूखंडामध्ये तात्काळ डांबरी रस्ते, गटारी, स्ट्रीट लाईट याचे टेंडर करून कामकाज करावे. सध्या करमाळा एमआयडीसी मध्ये पाणी उपलब्ध करण्यासाठी एक विहिर खोदण्यासाठी शासनाने मंजुरी दिली आहे. मात्र या विहिरीचे पाणी प्रकल्पांना पुरणार नाही. सध्या झालेली रस्त्याची कामे ही निकृष्ट दर्जाचे झाले असून ठेकेदाराने हलगर्जीपणा केल्यामुळे केलेले रस्ते उध्वस्त झाल्याचे उद्योग मंत्रीच्या निदर्शनास आणून दिले. एमआयडीसी मधील भूखंडाचे दर प्रमाणापेक्षा जास्त असल्यामु उद्योजक येथे येण्यास टाळाटाळ करत आहेत. सोलापूर एमआयडीसी पेक्षा करमाळा दर जास्त आहे. प्लॉट वाटप करण्यापूर्वीच अजून १५ टक्के दरवाढ केली आहे. या भावात तर जमिनी विकत मिळतात, अशी तफावत आहे. एमआयडीसी विकसित करायची असेलतर भूखंडाचे दर कमी करणे गरजेचे आहे.

दवे आयुर्वेद भवन
पनवेल
आमची दर्जेदार उत्पादने
रक्तशर्करा नियंत्रण : स्वीटो नील पावडर व काढा
जास्वंद तेल : केसविकारांसाठी
चोपचिनी काढा : संधीवात व त्वचा विकारांसाठी
मसलजेसीक तेल : वाताचे दुखणे, कंबरदुखी यासाठी सुप्रसिध्द तेल
मिळण्याचे ठिकाण : अभंग आयुर्वेद शिवाजीनगर, करमाळा., जि.सोलापूर
● संपर्क : डॉ.अमित दवे (मो.९८३३०३७२०८) / जी.व्ही.कुलकर्णी (मो.९४०४०४३०९१)

या दिवाळीत वाचवा 'रोख पैसे' आणि घ्या..
स्वत:ला आपल्या आवडीचे.. गिफ्ट

Happy Dipavli

दिवाळी धमाका ऑफर
कुर्ती/जीन्स/टॉप खरेदीवर
15% सुट

खरेदी...
थोडी असो वा जास्त
मिळवा हमखास
डिस्काउंट !



ऑफर कालावधी : दि.२७ ऑक्टोबर २०२२ पर्यंत !

एक पाऊल सुंदरतेकडे !
लेडीज फर्स्ट
गुजरगल्ली, करमाळा.
मो.9890322773



ज्योतीप्रकाश ज्वेलर्स



चांदी दागिण्यांच्या मजुरीवर 50% सुट
सुवर्णसंचय आभुषण योजना चालू आहे.
सर्टिफाईड राशिरत्ने मिळतील

ऑफर कालावधी
दि.२१ ऑक्टोबर २०२२ ते ४ नोव्हेंबर २०२२

खास दिपावली ऑफर
जेवढे सोने तेवढी चांदी मोफत

आमचेकडे होलमार्क प्रमाणित सोने-चांदीचे दागिणे तयार व ऑर्डरप्रमाणे घडवून मिळतील.
पत्ता : प्रसाद नमकीन चिवडे मिठाई समोर, राशिनपेठ करमाळा. प्रोप्रा : प्रकाश पांडूरंग बोकन (८६००४०५४३२)



ग्राहकांच्या उदंड प्रतिसादामुळे दसरा-दिवाळी सणानिमित्त
सुटींग, शर्टिंग सेवा सुरू !
खरेदीवर सवलत 10%



विशाल गारमेंटस् ॲन्ड विशाल टेलर्स

एकवेळ अवश्य भेट द्या !
रेडिमेड सुटींग, शर्टींग होजिअरी
प्रोप्रा : हेमंत बिडवे (9422447346)
निलेश बिडवे (9422447216)
असंख्य मेन्सवेअरच्या व्हरायटी

पत्ता : छत्रपती कॉम्प्लेक्स, पुणे रोड, करमाळा. जि.सोलापूर



Dattakala Shikshan Sanstha's
# Dattakala Group of Institutions

(NAAC Accredited and ISO Certified)
Affiliated to **Savitribai Phule, Pune University** Swami-Chincholi (Bhigwan), Tal-Daund, Dist-Pune 413130
Mob.9767726252, 9673002929, 9922051144 email.dkgoi@dattakala.edu.in



Prof.Ramdas Zol

**Admissions Open for 2022-23**

Admissions are open for the following courses for the Academic year 2022-23

| Name of College | Courses | Choice Code |
|---|---|---|
| Dattakala Group of Institutions Faculty of Engineering (BE) | Civil Engg. | 662819110 |
| | Computer Engg. | 662824510 |
| | Electrical Engg. | 662829310 |
| | E & TC Engg. (Only for Direct 2nd Year) | 662837310 |
| | Electronics & Computer Engineering (Only for 1st Year) | 662884410 |
| | Information Technology | 662824610 |
| | Mechanical Engg. | 662861210 |
| Dattakala Group of Institutions Faculty of Engineering (ME) | Civil Engg. (Construction Management) | 662820610 |
| | Computer Engg. | 662824510 |
| | Electrical Engg. (Power System) | 662829210 |
| | Mechanical Engg. | 662861210 |
| Dattakala Group of Institutions Faculty of Management | MBA | 662810110 |
| | MCA | 662824110 |

**Facilities available in the campus :**
1) Wi-Fi campus
2) Highly qualified & Experienced teaching staff
3) Training & Placement facility
4) College bus facility
5) Hostel for Boys and Girls
6) Mess & Canteen facility





Prof. Ramdas M. Zol
(Founder - President
Dattakala Shikshan Sanstha)

Dr.A.A.Keste
(principal DKFoE)

Dr.Sharad Karne
(Directorl DKFoM)

# चंदूकाकांनी सर्वसामान्य जनतेसाठी केलेले कार्य प्रेरणादायी : आमदार शिंदे





करमाळा(सं.प्र.) : चंदूकाकांनी सर्वसामान्य जनतेसाठी केलेले कार्य प्रेरणादायी असून, जनसामान्यांचे नेते असलेले चंदूकाका यांच्या कार्यास आपला सदैव पाठींबा राहील; असे प्रतिपादन आमदार संजय शिंदे यांनी केले.

चिखलठाण ग्रामपंचायतीचे सरपंच चंद्रकांत सरडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार कार्यक्रमात आ.शिंदे बोलत होते. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून माजी आमदार जयवंतराव जगताप उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.शिंदे म्हणाले, की शेतकरी कुटूंबामध्ये जन्म घेऊन आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर चंद्रकांत सरडे यांनी ग्रामपंचायत सदस्य ते जिल्हापरिषद सदस्य, आदिनाथ कारखाना व्हा.चेअरमन, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अशी पदे भूषवली आहेत. सध्या ते जनतेचे सरपंच म्हणून काम करीत आहेत. आपल्या कार्याच्या जोरावर अखंड जनसुमदायाचा पाठींबा मिळवून कार्यकर्ते टिकवून विकासाचा रथ चालवणे एवढे सोपे नाही. त्यासाठी जनसामान्यांची सेवा करण्याचा पिंड असावा लागतो. काकांनी साखर कारखानदारी, ऊस तोडणी वाहतूकीच्या माध्यमातून अनेकांना रोजगार मिळवून दिला असून जनसामान्याचा नेता म्हणून त्यांची राजकारणात ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या या कार्यास आपला सदैव पाठींबा राहील.

यावेळी बोलताना श्री.जगताप यांनी की आगामी जिल्हापरिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणूक शिंदे गट-जगताप गट युतीच्या वतीने लढविण्यात येणार.

या कार्यक्रमास आदिनाथचे माजी संचालक तानाजी झोळ, माजी चेअरमन वामनराव बदे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य उध्दव माळी, दादासाहेब लबडे, भोसेचे माजी सरपंच भोजराज सुरवसे, साडे विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक निवृत्ती सुरवसे, महादेव कामटे, सामाजिक कार्यकर्ते श्रेणिक खाटेर, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, उमेश बोराडे आदी मान्यवर उपस्थित होते. आमदार शिंदे यांचे हस्ते चंद्रकांत सरडे यांचा सत्कार करण्यात आला. सरडे यांच्या वाढदिवसा-निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन चंद्रकांत सरडे युवा मंचच्या वतीने करण्यात आले होते. यामध्ये आदर्श सरपंच भास्करराव पेरे यांचे व्याख्यान व रक्तदान शिबीर घेण्यात आले. रक्तदान शिबीरात १०१ जणांनी रक्तदान केले. सोलापूर येथील सिध्देश्वर ब्लड बँकेने रक्त संकलन केले. उद्घाटन ह.भ.प.दुर्गाप्रसाद तिडके महाराज यांचे हस्ते झाले. दिवसभरामध्ये चंदुकाकांना शुभेच्छा देण्यासाठी देवानंद बागल, नानासाहेब लोकरे, कन्हैय्यालाल देवी, धनंजय डोंगरे, धुळाभाऊ कोकरे, अजित तळेकर, डॉ.गोरख गुळवे, सुनील सावंत, गणेश करे-पाटील, राजेंद्रसिंह राजेभोसले यांनी प्रत्यक्ष भेट देऊन सरडे यांचा सत्कार केला. चिखलठाण ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरीकांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'आमदार आपल्या दारी' उपक्रम जेऊर येथे संपन्न

करमाळा(सं.प्र.) : विविध शासकीय योजनांचा लाभ नागरीकांना थेट त्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने 'आमदार आपल्या दारी' हा उपक्रम करमाळा विधानसभा मतदार संघात आमदार संजयमामा शिंदे यांच्या सूचनेनुसार राबविण्यात आला. आत्तापर्यंत रावगाव, जातेगाव, चिखलठाण, कंदर, केत्तूर, कोर्टी, साडे, वांगी नं.३ या ठिकाणी राबवलेल्या उपक्रमांमधून जवळपास १४ हजार नागरीकांना या उपक्रमाचा लाभ झाला. त्यामुळेच जेऊर येथे ग्रामस्थांच्या मागणीनूसार १८ ऑक्टोबरला 'आमदार आपल्या दारी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जेऊर येथील शिबीरामध्ये नागरीकांना नवीन रेशनकार्ड, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ, निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी वृध्दपकाळ योजना, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकुल योजना आणि नवीन मतदार नोंदणी, उज्वला गॅस योजना, एस.टी.बस पास, मोतीबिंदू तपासणी व उपचार, आधारकार्ड नोंदणी, ई श्रम नोंदणी, दिव्यांग नोंदणी, असंघटीत कामगारांची नोंदणी अशा विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. तसेच प्रातिनिधिक स्वरूपात काही प्रमाणपत्रांचे वाटपही करण्यात आले. या शिबीराचा लाभ दहिगाव, शेलगाव(वां), लव्हे, निंभोरे, शेटफळ, जेऊरवाडी, जेऊर या गावांना झाला. या उपक्रम यशस्वी करण्यासाठी उमेश पाथरूडकर, बालाजी गावडे, नितीन खटके, दिनेश घाडगे, सुहास तावरे, राजेश ननवरे, बाळासाहेब गरड, मनोज माने, महेश कांडेकर, गणेश निमगिरे, धनेश निमगिरे, राजू घाडगे, रणजित कांबळे, रमेश लगस, अरूण निर्मळ, समीर केसकर यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.विकास वीर यांनी केले तर उपस्थितांचे आभार नितीन खटके यांनी मानले.

# डिसेंबर पर्यंत मुदत संपणाऱ्या ३० ग्रा.पं.च्या मतदार याद्या जाहीर


करमाळा (सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील डिसेंबर पर्यंत मुदत संपणाऱ्या ३० ग्रामपंचायतीच्या मतदार याद्या तहसील कार्यालयाने जाहीर केल्या आहेत. यामध्ये पोंधवडी, शेलगाव(वांगी), पारेवाडी, दिवेगव्हाण, गोयेगाव, खातगाव, कात्रज, कोंढारचिंचोली, अंजनडोह, विहाळ, मोरवड, देलवडी, कुंभारगाव, खडकी, भिलारवाडी, हिंगणी, पोमलवाडी, जिंती, वरकटणे, दहिगाव, वाशिंबे आदी गावांचा समावेश आहे.


दिव्यरत्न
१ महिन्याच्या बजेट मध्ये २ महिन्याचे मटेरिअल
क्वॉलिटी हाऊसकिपींग मटेरिअल
ऑथोराईज्ड ऑनलाइन रेल्वे/विमान तिकीट बुकींग सेंटर
उत्कृष्ट दर्जाचे वॉशिंग पावडर, वॉशिंग मशीन लिक्वीड, कम्फर्ट, हॅन्डवॉश, फिनेल, हॅन्डमेड बाथ सोप, टॉयलेट क्लिनर(८० रू. लि.), डांबर गोळी, व्हाईट कपड्यांसाठी आला लिक्वीड ८० रू. लिटर
कपड्याचे साबण(१२० रू. किलो), अंगाचे साबण (२५ रू. पासून पुढे)
भांड्याचे लिक्वीड, भांड्याचे साबण, पितांबरी, ड्रेनेक्स, जाळी झाडू, लाँग झाडू, खराटे, बकेट मोप, मॅट, रूम फ्रेशनर, ओडोनील, चिमटे, आकर्षक डिझाईन्सच्या कुंड्या, किचन वायपर, डस्टर क्लॉथ, ग्लास क्लिनर इ. मिळण्याचे एकमेव ठिकाण !
हॉस्पिटलसाठी लागणारे फिनेल, एअरफ्रेशनर्स, डांबर गोळी होलसेल दरात मिळेल.
१ महिन्याचे क्लिनिंग किट आकर्षक किंमतीत उपलब्ध
माल क्वॉलिटी.., किंमत कमी ! एकवेळ अवश्य भेट द्या..!!
पत्ता : ज्योती-क्रांती बँकेसमोर, दत्तपेठ, करमाळा.
मो.9420650163



॥ श्रीराम समर्थ ॥
श्री गजानन आयुर्वेद
मल्टीस्पेशालिटी स्पाईन ऑर्थो केअर सेंटर
डॉ.श्री.दिपक सुर्यकांत पाटील एम.डी.(आयुर्वेद), पुणे
I.S.O.9001-2018 Certified
डॉ.सौ.वैष्णवी दिपक पाटील आयुर्वेदाचार्य (मुंबई)
आयुर्वेदाचे वरदान-ऋतू बदलानूसार 'पंचकर्म' व्दारे शरीरशुध्दी
- वमन/विरेचन -
खालील आजारावर उपयुक्त...
वाढलेले वजन, आम्लपित्त, जुनी सर्दी, पिंपल्स कफाचा त्रास, पोटाच्या तक्रारी, स्किन इन्फेक्शन सोरियासिस, Eczema, वाढलेली उष्णता, स्त्रीयांमधील पाळीच्या तक्रारी P.C.O.D., स्त्री-पुरूष वंध्यत्व, थायरॉइडचा त्रास इ.
उपलब्ध सुविधा...
• प्रकृतीपरिक्षण-नाडीपरिक्षण
• पंचकर्मव्दारे शरीरशुध्दी
• प्रतिकारशक्ती वाढविणारी रसायन चिकित्सा
• ऋतुचर्या-दिनचर्या मार्गदर्शन
• अनुभवी प्रशिक्षित केरळीयन पंचकर्म स्टाफ
पत्ता : 'श्रीस्मरण', बिल्डींग, शाहूनगर(सेकंड लेन), श्रीकमलाभवानी रोड, करमाळा.
मो.9822997409 / 9970765945
www.spineorthoayurved.com shrideepak17@gmail.com shrigajananayurved Shri Gajanan Ayurved Multispecialty Spira Ortha Care



आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर

रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
fastrack
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२


वस्त्र विश्वातील एकमेव दालन...
ओंकार
कलेक्शन
*ऑफर कालवधी दि.११ ते २१ ऑक्टों. २०२२ पर्यंत
खास दिपावलीच्या
2000/- रु
पुढील खरेदीवर हमखास गिफ्ट
बजाज शोरुम शेजारी, बायपास रोड,
कृष्णाजीनगर, करमाळा MOB.9579191904


THE WORLD'S FAVOURITE INDIAN
BAJAJ
आमच्या असंख्य ग्राहकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
भव्य लोन व एकसचेंज मेळावा
DIWALI DHAMAKA OFFER
शिवरत्न बजाज मध्ये दिपावली निमित्त आपली आवडती
बजाज बाईक बुकीग करा व मिळवा ४ भरघोस बक्षिसे
२०००रु कॅश डिस्काउंट
५ वर्ष वॉरंटी
६ सर्व्हिस फ्री
हेल्मेट फ्री
MEGA EXCHANGE OFFER
कोणत्याही कंपनीची जुनी दुचाकी घेउन या व बजाज कंपनीची कोणतीही नवीन दुचाकी घेउन जावा
९५% पर्यंत अर्थसहाय्य
ऑफर कालावधी ३१/१०/२०२२ पर्यंत
नियम व अटी लागू
Happy Diwali
Happy Diwali
कमीत कमी डाउनपेमेंट
कमीत कमी व्याजदर
कमीत कमी कागदपत्रे
आकर्षक फायनान्स स्किम
त्वरीत लोन मंजुर
शिवरत्न बजाज
Authorised Dealer For Bajaj Auto Ltd.
मु पो जेऊर, ता करमाळा, जि सोलापूर
संपर्क: 9922044676 / 9158540555
कमलाई मोटर्स
Authorised Service Center For Bajaj Auto Ltd.
कृष्णाजी नगर करमाळा, ता करमाळा
संपर्क: 9503374142 / 9011540555

" शून्यामधूनी विश्व निर्मुनी, कीर्ति सुगंध वृक्ष फुलवूनी,
माया, प्रीती, संस्कार देवूनी, सत्य-सचोटी, मार्ग दावूनी,
अमर झाला तुम्ही जीवनी"

भावपूर्ण श्रद्धांजली



भावपूर्ण श्रद्धांजली

## कै. आत्माराम नारायण साडेकर (सर)

यांचे

### ।। प्रथम पुण्यस्मरण।।

मिती आश्विन कृ. ।।१२।।, शनिवार, दि. २२-१०-२०२२
दुपारी १२.०० वाजता

**आपले विनीत**

श्रीमती मिनाक्षी आत्माराम साडेकर
श्री. गिरीष आत्माराम साडेकर
सौ. स्वाती भारत बनसुडे
श्री. संतोष आत्माराम साडेकर
श्री. उमेश आत्माराम साडेकर

**समस्त साडेकर परिवार**

स्थळ : 'सुदर्शन' महेंद्रनगर, करमाळा, जि. सोलापूर

---

सर्व ग्राहक व हितचिंतकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

## Royal शेतकरी
दर परफेक्ट मेन्स शॉप

दिपावली स्पेशल ऑफर

| | | |
|---|---|---|
| 3000 च्या खरेदीवर ब्रँडेड **बॉडी स्प्रे फ्री..** | 6000 च्या खरेदीवर ब्रँडेड **स्मार्ट वॉच फ्री..** | 4000 च्या खरेदीवर ब्रँडेड **ब्लूटुथ हेडफोन फ्री..** |

- ब्रँडेड शर्ट : Rs.499
- ब्रँडेड जीन्स : Rs.849 ते 949
- पॉपकॉर्न आरमानी : Rs.499
- आरमानी : Rs.499
- प्लेन ओजी आरमानी : Rs.999

**छत्रपती चौक, भवानीनाका, जामखेड रोड
करमाळा., जि.सोलापूर**

---

## ...स्वर्ण दिवाळी...



21 ऑक्टोबर 2022 – 01 नोव्हेंबर 2022

## अलंकार ज्वेलर्स

### खास दिवाळी निमित्त

| प्रथम बक्षीस | द्वितीय बक्षीस | तृतीय बक्षीस |
|---|---|---|
| TVS Scooty | 32" LED TV | Sewing Machine |

१ ग्रॅम सोने खरेदीवर १ ग्रॅम चांदी फ्री व खास आर्कषक भेटवस्तू.
* (१ ग्रॅमच्या पटीत)

पैंजणाच्या खरेदीवर घडणावळीत १०% सूट

प्रत्येकी रु. ३०००/- च्या गोल्ड फार्मिंग ज्वेलरी खरेदीवर एक कूपन

* नियम व अटी लागू.

Follow Us

# अनिल तुकाराम वाशिंबेकर

मेनरोड, करमाळा. 7744060558

Pixosquare Creation_8390955858

# अडचणीवर मात करत नव्या क्षेत्रात भरारी

## बाळासाहेब आमटे यांची वाटचाल



घरची परिस्थिती बेताची त्यामुळे शिक्षण नाही. आणि शिक्षण नसल्यामुळे नोकरी नाही. अशा माणसांना कुठंतरी मजुरी करून उपजिविका भागवावी लागते. पण काहीजण असे असतात की.. अशा प्रतिकूल परिस्थितीवर मात करत न क्षेत्र प्रादाक्रांत करत त्यात यश मिळवून आपले भविष्य घडवित असतात. अशाचप्रकारे पोथरे येथील बाळासाहेब मच्छिंद्र आमटे यांनी आपली प्रगती केली आहे.

पोथरे येथील मच्छिंद्र आमटे व सौ.समाबाई आमटे यांना बाळासाहेब व सतीश अशी दोन मुले आहेत. घरी जुजबी शेती असल्याने फारशी प्रगती करणे शक्य नव्हते. शिक्षणासाठी आवश्यक तो पैसा नसल्यामुळे बाळासाहेबांना जेमतेम बारावी पर्यंत शिक्षण घ्यावे लागले. त्यांचे प्राथमिक शिक्षण पोथरे येथे तर माध्यमिक शिक्षण आण्णासाहेब हायस्कूल व बारावी पर्यंत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात २००२ साली पूर्ण झाले. बारावी पास झाल्यानंतर पुढे शिक्षणासाठी घरातून पाठबळ मिळाले नाही. त्यावेळी बाळासाहेबांनी आपल्याला शिक्षण मिळत नसेलतर व्यवसायिक ज्ञान मिळवले पाहिजे व आपले भविष्य घडविले पाहिजे; असा विचार केला. त्यानूसार त्यांचे मामा गणपत दांडेकर (श्रीगोंदा) यांचे श्रीगोंदामध्ये मोटारसायकलचे गॅरेज होते. ते बारावी नंतर मामाच्या इथे गॅरेजमध्ये कामाला गेले. दोन वर्षे तेथे मोटारसायकल दुरूस्तीचे कामकाज शिकले. त्यानंतर त्यांनी पुन्हा करमाळ्याला आपले नशिब अजमाविण्याचा प्रयत्न केला. मुकूंद सुर्यवंशी यांच्या ऑटोमोबाईल दुकान समोर दोन वर्षे तर हरिश्चंद्र घाडगे यांच्या ऑटोमोबाईल समोर चार वर्षे मोटारसायकल दुरूस्तीचे कामकाज केले. त्यानंतर ७ मार्च २०११ ला बाजार समितीतील एक गाळा मिळवून जामखेड रोडला स्वत:चे शनैश्वर ऑटो असे दुकान सुरू केले. स्पेअरपार्ट आणि मोटारसायकल दुरूस्ती ही कामे सुरू केली. करमाळा शहरातील अनेक वाहन चालकांना बाळासाहेबांच्या कामाची माहिती असल्याने त्यांनी आपली कामे त्यांच्या दुकानात सुरू केली आणि बाळासाहेबांनी या क्षेत्रात आपली कारकिर्द उंचावली. स्वत:सह चार कारगिर असून अनेक ग्राहक कामासाठी नंबर लावतात हे त्यांचे यश आहे.

बाळासाहेब मच्छिंद्र आमटे यांचा सौ.स्वाती यांचेबरोबर विवाह झाला असून त्यांना आकाश व आकांक्षा अशी दोन मुले आहेत. त्यांनी स्वत: मॅकेनिक झाल्यानंतर आपला भाऊ सतीश यालाही टेक्नीकल नॉलेज मिळायला पाहिजे हे गृहित धरून त्यांना स्लाईडींग विंडो, डोअर याचे प्रशिक्षण दिले आणि त्यांनाही स्वतंत्र दुकान टाकून दिले आहे. सतीश आमटे यांचा सौ.कल्पना यांच्याबरोबर विवाह झाला असून त्यांना सर्वेश व स्वरांजली ही दोन मुले आहेत. बाळासाहेब यांनी केवळ व्यावसायिकच प्रगती केली अशी नाहीतर आपली वाडवडिलार्जित जमिनीची लेवल केली, बांधबंदिस्ती केली. लिंबोणी, केळी अशा फळबागा करून शेतीचीही प्रगती केली असून त्यातूनही त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे. कष्ट, जिद्द व प्रयत्नाच्या जोरावर अडचणीवर मात करून माणूस कसा उभा राहू शकतो; याचे मुर्तिमंत उदाहरण बाळासाहेब आमटे यांचे आहे.

**न्यु. प्रविण सुपर मार्केट**

- बोल्ड नं.१ बदाम – ६५० रू. किलो
- नं.१ काजू – ७०० रू.किलो
- पिस्ता – २५० रू. पावकिलो
- मनुका – ६० रू. पावकिलो
- खजूर (डेटक्राऊ) – १४० रू अर्धाकिलो
- खजूर – ७० रू. अर्धाकिलो
- केळी वेफर्स – १०० रू. अर्धाकिलो
- जोडगहू – ६० रू. किलो
- पाणीपुरी – २५ रू. पावकिलो
- पॉपकॉर्न मका – ३० रू. पावकिलो
- मोहूरी(बारीक) – ८० रू. किलो
- महावीर पापड – ११० रू. अर्धाकिलो
- नाचणी – ५० रू.किलो

**स्पेशल कडधान्य...**

- मटकी – १०० रू. किलो
- मटकी स्पे.गावरान – १३० रू. किलो
- काबोली – ८० रू. किलो
- वटाणा हिरवा – ६५ रू. किलो
- मुग(बारीक) – ७० रू.किलो
- चवळी – ७० रू.किलो
- अख्खा मसुर – ९० रू.किलो
- भारी राजगिरा – १०० रू.किलो
- पाणीपुरी वटाणा – ७० रू. किलो
- शाबुदाणा – ६५ रू.

**गुळभेंडी, सुरती, हूरडा बी मिळेल.**

- नं.१ २१८९ गहू – ३० रू.किलो
- नं.१ २४९६ गहू – ३१ रू.किलो
- ज्वारी(बेस्ट) – ४० रू.किलो
- नं.१ बाजरी – ३० रू.किलो

**दिवाळीचा किराणा माल होलसेल भावात घरपोच मिळेल.**

संपर्क
ज्योती-क्रांती बँकेच्या शेजारी, दत्तपेठ, करमाळा
मो.9168052318






# वाशिंबेकर

## सराफ अ‍ॅन्ड सन्स

बदलत्या वेळे नुसार आपल्या लाडक्या लेकीच्या भविष्याच्या आनंदासाठी आजच ह्या बचत योजनेचा लाभ घ्या!

**सुवर्ण सुमृद्धी सुवर्ण बचत योजना**

**११ + १ महिना फ्री | १८+ २ महिने फ्री**

**२४ + ३ महिने फ्री**

दिनांक:- १ नोव्हेंबर पासुन सुरु

(टिप:- नियम व आटी लागु )

## डबल धमाका ऑफर

# जितके सोने तितकी चांदी फ्री..

५०००/- पासुन सुरुवात

दिनांक:- १७ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर पर्यंत

मो.८४५९००३४२८ | ९४२१०६२८६२

सुभाष चौक, डॉ. पुंडे हॉस्पीटल शेजारी, राशिन पेठ, करमाळा, जि.सोलापूर ४१३२०३

# ओला दुष्काळ जाहीर करावा - प्रतापराव जगताप




करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्याची दखल घेत शासनाने लक्ष घालून राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना भरीव मदत करावी; असे लेखी निवेदन करमाळा तालुका काँग्रेस आयचे तालुका अध्यक्ष प्रताप जगताप यांचे नेतृत्वाखाली तहसीलदार समीर माने यांना देण्यात आले. या निवेदनात शेतकरी हिताच्या दृष्टीने अनेक मागण्या करण्यात आल्या असून यामध्ये संपूर्ण राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, हेक्टरी ७५ हजार रूपये मदत मिळावी, मजुरांसाठी विशेष अनुदान जाहीर करावे आदी मागण्या करण्यात आल्या. यावेळी गफुरभाई शेख, जैनुद्दीन शेख, दस्तगीर पठाण, गोपीनाथ नाळे, दादा कुदळे, सुजय जगताप, योगेश राखुंडे, उत्तरेश्वर सावंत, गणेश फलफले, गितेश लोकरे, नितीन चोपडेआदी उपस्थित होते.

# दिवाळीच्या कालावधीत वीजपुरवठा सुरळीत ठेवावा- जगदीश आगरवाल



करमाळा (सं.प्र.) : दिवाळीच्या कालावधीत वीज महावितरणने अखंडीत आणि सुरळीत वीजपुरवठा सुरू ठेवावा; अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष जगदीश आगरवाल यांनी केली आहे. याबाबत आगरवाल यांनी वीज वितरण कार्यालयास निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे, की दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सामान्य ग्राहकांची किराणा दुकाने, कापड दुकाने, मिठाईची दुकाने इ. ठिकाणी खरेदीसाठी गर्दी असते. अशात वीजपुरवठा खंडीत झाला तर ग्राहक आणि दुकानदार या दोघांनाही व्यत्यय येतो. तसेच दिवाळी हा प्रकाशाचा आणि दिव्यांचा सण असल्यामुळे घराघरातून आकाशकंदील लावून रोषणाई करण्यात येते. त्यामुळे दिवाळीच्या कालावधीत वीज महावितरणे वीज ग्राहकांना अखंडीत वीजपुरवठा देण्याच्या दृष्टीने ठोस पावले उचलावीत; अशी मागणी भाजपाचे शहराध्यक्ष जगदीश आगरवाल यांनी केली

## गुळसडी रस्त्यालगत असलेल्या ओढ्याच्या पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या
# अशोक जाधव यांच्या कुटूंबियांस शासनाने आर्थिक मदत द्यावी : हनुमंत मांढरे-पाटील

करमाळा(सं.प्र.) : ११ ऑक्टोबर रोजी ढगफुटी सारखी अतिवृष्टी झाल्याने गुळसडीकडे जाताना असलेल्या पांडव ओढ्याला महापूर आला होता. या महापूरात अशोक रामदास जाधव हे पाण्याचा अंदाज न आल्याने वाहून गेले व त्यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. जाधव हे परजिल्ह्यातून कुटूंबाच्या उदरनिर्वाहसाठी इकडे येऊन मोलमजुरी करत होते. ते कुटूंबातील कर्ता व्यक्ती असल्याने त्यांच्या जाण्याने कुटूंबावरती उपासमारीची वेळ आली आहे. तरी शासनाने या बाबीची दखल घेऊन नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन मधून जाधव कुटूंबियांना तातडीची आर्थिक मदत द्यावी; अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष हनुमंत मांढरे-पाटील यांनी केली आहे.



# भिवरवाडीच्या सरपंच पदी सविता सुळ

करमाळा(सं.प्र.) : भिवरवाडी हे गाव विभक्त होऊन पहिल्यांदा ग्रामपंचायत निवडणूक झाली. या ग्रामपंचायतीवर बागल व शिंदे गटाची सत्ता आली आहे. सरपंच पदी सविता रामचंद्र सुळ यांची तर उपसरपंच पदी डॉ.भाऊसाहेब रोहिदास शेळके यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यावेळी भारत साळुंके, विश्वनाथ जाधव, युवराज मांढरे, डॉ.राखुंडे, सतीश देशमुख, पांडूरंग राखुंडे, ग्रा.पं.सदस्य आबासाहेब राखुंडे, गायत्री शेळके, विठ्ठल आरकिले, विकास आरकिले, आनंद शेळके, सुनील सुळ, भिमराव सुळ, बबन शेटे, किरण साळुंके, दिपक ढाणे उपस्थित होते.

# ज्योतिर्लिंग दूध केंद्र तर्फे साखर वाटप

करमाळा (सं.प्र.) : दिवाळी सणाचे औचित्य साधून श्री ज्योतिर्लिंग दूध संकलन केंद्र झरे यांचे वतीने चेअरमन सोमनाथ घाडगे यांनी सर्व दूध उत्पादक शेतकऱ्यांना भाजपाचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे यांचे हस्ते साखर वाटप करण्यात आली. यावेळी वि.का.सोसायटीचे चेअरमन विठ्ठल घाडगे, उत्तरेश्वर शेळके, रामदास कुर्डे, बबन घाडगे, सोमनाथ घाडगे, पिंटू कोठावळे, कल्याण आमृळे, निखिल कोकाटे, औदुंबर जोशी, दादा दुर्गूळे, दत्तात्रय कोकाटे, बबन गायकवाड, शिवाजी घाडगे, पोपट ढेरे, दादा काळे, किशोर शिंदे, अशोक कोठावळे इ. दूध उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# चौफेर वाचनाने आलेली प्रगल्भता व्यक्तीमत्वाची उंची वाढवते : डॉ.अरूण अडसुळ



करमाळा(सं.प्र.) : जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर स्वत:च्या कर्तृत्वाचा ठसा उमटवता येतो. गरीबी, दारिद्रय यांच्यावर मात करून कोणत्याही वशिल्याशिवाय स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करता येते आणि मिळालेल्या संधीचं सोनं करून सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर आयुष्याला सुंदर आकार देता येतो. चौफेर वाचनाने आलेली प्रगल्भता व्यक्तीमत्वाची उंची वाढवते; असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.अरूण अडसुळ यांनी केले.

जेऊर येथील भारत महाविद्यालयात आयोजित कर्मयोगी व्याख्यानमालेत 'आयुष्याला आकार देताना' या विषयावर डॉ.अडसुळ बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अनंत शिंगाडे हे होते. यावेळी महाराष्ट्र करियर अकॅडमी कुंभेज फाटाचे प्रमुख श्री.पाटील यांच्या 'अग्नीवीर' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ.अडसुळ यांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व डॉ.अडसुळ यांचा परिचय प्रा.डॉ.संजय चौधरी यांनी केले. उपस्थितांचे स्वागत प्रा.डॉ.अरविंद दळवी यांनी केले. यावेळी भारत हायस्कुल ज्यु.कॉलेजचे प्राचार्य दहिभाते, भूषण लुंकड, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह जेऊर आणि परिसरातील नागरीक, विद्यार्थी उपस्थित होते.

# उपजिल्हा रूग्णालयाच्या बांधकामासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद



करमाळा (सं.प्र.) : येथील उपजिल्हा रूग्णालयामध्ये ५० खाटांचे श्रेणीवर्धन करून १०० खाटांचे रूग्णालय इमारत बांधकामासाठी जुलै २०२१ मध्ये २५.२० कोटीची प्रशासकीय मंजुरी मिळालेली होती. सदर उपजिल्हा रूग्णालयासाठी २० ऑक्टोबर २०२२ च्या शासनाच्या परिपत्रकानुसार निधीची तरतूद केलेली आहे. सदर निधी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये हुडको या योजने अंतर्गत मंजूर करण्यात आलेला आहे. हा निधी असल्याने करमाळा येथील उपजिल्हा रूग्णालयाच्या बांधकामाचा मार्ग आता मोकळा झालेला आहे. लवकरच या बांधकामाची निविदा प्रक्रिया निघून प्रत्यक्ष बांधकामास सुरूवात होईल. सन २०२२-२३ च्या अर्थसंकलपीय अधिवेशनामध्ये ग्रामीण रूग्णालय बांधकाम करण्यासाठी ३२ कोटी ७४ लाख ९१ हजार रू. चा निधी हस्तांतरीत करण्यात आलेला असून यामुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ५१ ग्रामीण रूग्णालयाच्या बळकटीसाठी या निधीचा उपयोग होणार असल्याचेही आ.संजयमामा शिंदे यांनी सांगितले.

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात
# डॉ.अब्दुल कलाम जयंती साजरी

करमाळा (सं.प्र.) : येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

हा कार्यक्रम महाविद्यालयातील विद्यार्थी अबुतालीब शेख यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून विद्यार्थीनी सुप्रिया पवार व अमित सरवदे हे होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विद्यार्थी दिपाली राऊत यांनी केले. प्रास्ताविक भाग्यश्री बिनवडे यांनी केले. यावेळी अमन आरणे, रामेश्वर भरते, सूरज सुपे, साक्षी शिंदे, प्रतिक्षा पवार, अपर्णा शिंदे, अंकिता वाबळे व प्राची हिंगणे या विद्यार्थीनींनी आपले मत व्यक्त केले.

अध्यक्ष अबुतालीब शेख यांचेही यावेळी भाषण झाले. अमृता आरणे हिने आभार मानले. या कार्यक्रमाचे निरीक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.अनिल साळुंके, प्रा.प्रदीप मोहिते, ग्रंथालय विभाग प्रमुख श्रीमती डॉ.रामटेके यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी अतिशय परिपूर्ण असा हा कार्यक्रम सादर केला. प्राचार्य डॉ.पाटील यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

## आनंद पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध
# चेअरमन पदी डॉ.सुभाष सुराणा



करमाळा(सं.प्र.) : जेऊर येथील आनंद नागरी पतसंस्थेची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध झाली असून चेअरमन पदी डॉ.सुभाष सुराणा यांची तर व्हा.चेअरमन पदी सुहास रोकडे यांची निवड करण्यात आली आहे. करमाळा तालुक्यातील विश्वासू असलेल्या आनंद पतसंस्थेची १९९२ साली स्थापना झाली होती. स्थापनेपासून आजपर्यंत एक निवडणूक सोडलीतर सर्व निवडणूका बिनविरोध झालेल्या आहेत. विद्यमान सुहास रोकडे, किशोर राठोड, राजकुमार राठोड, संजय दोशी, पांडूरंग जाधव, महावीर दोशी, भूषण लुंकड, दिलीप मंडलेचा, इक्बाल शेख, अभय लुंकड, कळसाईत यांचे सहकार्य लाभल्याचे संस्थापक व नूतन चेअरमन डॉ.सुभाष सुराणा यांनी सांगितले. बिनविरोध संचालक:- अभयराज लुंकड, किशोर राठोड, संजय दोशी, पांडूरंग जाधव, ताहेराबी शेख, उषा मंडलेचा, अनिल कळसाईत, तानाजी शिंदे, रामचंद्र कांबळे.

सा.संदेश वार्षिक वर्गणी १५० रू. भरून घरपोच वर्षभर अंक मिळवा..!

# माझे गुरू साडेकर सर..!



असंख्य पाखरांच्या किलबिलाटाने एखादे मोठे झाड गजबजून जावे, तसे आमचे करमाळ्याचे महात्मा गांधी विद्यालय ! आत्माराम नारायण साडेकर हे त्या विद्यालयातील मला भावलेले व्यक्तीमत्व. माझे गुरु ! हिंदी शिक्षक सनद (ज्यु.) राष्ट्रभाषा पंडित, डी.टी.सी. आर्ट मास्टर या चित्रकलेतील पदव्या, सी.पी.एड. ही शारीरिक शिक्षणातील पदविका हा त्यांचा शैक्षणिक ठेवा !

गुरु और समुद्र दोनो ही गहरे है । पर दोनों की गहराई में एक फर्क है, समुद्र की गहराई मे इंसान डूब जाता है और गुरु की गहराई मे तर जाता है । गुरूवर्य मला चित्रकला शिकवत होते. माझ्या शाळेत खेड्यातून आलेल्या मुलांचा भरणा अधिक. पण त्यांच्या अंतरंगातील कला, त्यांच्याच हातातून उतरवण्याचे कसब सर लीलया पेलत. कागद, रंग, ब्रश, पेन्सिल सारे शाळे मार्फत मोफत असे. चित्र ठेवायला छान खाकी पिशवी. ब्रश रंगात बुडवून, हाताची बाही मागे सारत असायचा तुम्ही. आणि बघता बघता त्या पांढऱ्या शुभ्र कागदावर रंगाचे एक नवे जग तुम्ही उभे करायचा. चित्र काढता काढता तुम्ही बोलत असायचा.. 'अरेऽऽ रंगाची पेटी उघडली की रंग बोलले पाहिजेत आपल्याशी, आई जशी मुलांशी बोलते ना तसेच !' रंगांची ही अद्भूत भाषा तुम्हीच आम्हाला शिकविली. सारखे सारखे खोडरबराचे कागदाला भेटणे तुम्हाला आवडायचे नाही. तुम्ही कडेने फिरत लक्ष ठेवत असत. मग पट्टी असायची, पण मी कधीही त्या पट्टी मारल्याचा राग धरला नाही. किंबहूना सरांबद्दल फार आदर असल्यामुळे त्यांचे मारणे प्रसाद वाटे. सरांशी माझे घट्ट नाते होते. शिक्षक म्हणून सर रागवत होते, पण पालक या नात्याने फार माया करीत. शिक्षक विद्यार्थ्यांचे दुसरे पालकच असतात.

गुरु आम्हाला ATM सारखेच आहेत. Any time ते आम्हाला भरभरून संस्कार देतात. खरं पाहता संस्काराचे बीजारोपण करण्यामध्ये आमच्या गुरूजनांचा फार मोठा वाटा आहे. शारीरिक शिक्षणाचा तास म्हणजे पर्वणीच असे. लोकप्रिय खेळाडूंची माहिती देत, योगाचे महत्व पटवून देत, प्रार्थना करून घेत. खेळामुळे जीवनातील तत्वज्ञान तुम्ही कसे जगू शकता ? हे समरसतेने पटवून देत. हार आणि जीत या दोन्ही गोष्टींचे जीवनातील महत्व ते सांगत. आयुष्याला आकार देताना, विद्यार्थ्यांच्या यशामध्ये स्वप्ने शोधणारा शिक्षक असतो. हसत-खेळत शिक्षण, समाजातील जिवंत उदाहरणाव्दारे ते पटवून देत.

हिंदी या राष्ट्रभाषेचे महत्व विषद करताना, त्यांनी व्याकरण व शुध्द भाषाशैली शिकवली. अनेक अवांतर परीक्षा देण्यासाठी प्रोत्साहित केले. खरोखर शिक्षक हाच समाजाचा शिल्पकार असतो. ते शिस्तप्रिय व अनुशासन प्रिय होते. त्यांनी शिकविलेले धडे व कविता एवढे तन्मयतेने शिकवले जात, की ते आजही जसेच्या तसे आठवतात. समाजाचा विकास केवळ सत्तेने शक्य नाही तर त्यामध्ये आदर्श शिक्षकांचा फार मोठा हातभार असतो. बालमनाला सुरेख आकार देऊन परिपूर्ण व्यक्तीमत्व त्यांच्यामुळे घडते. त्यांनी फक्त मुलांना व्यावहारिक ज्ञान दिले नाही तर माणूस म्हणून घडविण्याचा मनापासून प्रयत्न केला. त्यांनी शाळेच्या प्रत्येक गणेशोत्सवात सुंदर आरास केली. चित्रकलेचा कुंचला राबवत, अनेक प्रदर्शने भरवली. विविध ठिकाणी विद्यार्थी-शिक्षकांच्या सहलींचे आयोजन केले. नाटकाच्या तालमी घेतल्या. अनेक लोकप्रिय नाटकात स्वत:ही भूमिका केल्या. नाटकांचे नेपथ्य करून सादरीकरणही केले. ज्याचा आत्मस्थ जागा असतो,त यालाच निसर्गातले काव्य वाचता येते, पाषाणातील शिल्प पाहता येते. डोंगरदऱ्या, नद्या, आकाश, अरण्य, पशुपक्षी, माणूस, सैतान... यातील मर्म चित्ररूपात रेखाटता येते. त्यालाच मनुष्यातील माणुसकीचा गंध असतो.

पुणे येथे शिक्षण घेत असताना, ऋषीतुल्य व्यक्तिमत्व डॉ.अच्युतराव आपटे यांच्याशी जवळचा संपर्क आला. सरांनी त्या संधीचे सोने केले. पुण्यातील विद्यार्थी सहाय्यक समिती मार्फत अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य उभे केले. माणसे जोडणे व माणसे टिकविणे हाच जीवन समृध्द करण्याचा एकमेव मार्ग आहे, हे संस्कार सरांनी आमच्यात ठासून भरले. पूर्वी विद्यार्थी गुरुकुलात शिक्षण घेत, पण आज शिक्षकच मोबाईलमध्ये बंद आहेत ! सरांनी पुस्तकी ज्ञानापेक्षा विद्यार्थ्यांना एक उत्तम संस्कारी नागरीक म्हणून घडविले.

सरांच्या सुविद्य पत्नी ह्या देखील आमच्या लाडक्या शिक्षिका ! या दोघांनी मला मानसकन्याच मानले. पू. बाई तर मला 'आशे' म्हणून हाक मारीत. तो जिव्हाळा, ते प्रेम आजतागायत टिकून आहे. हक्काने भांडणारी, हट्ट करणारी, आवडेल ते बाईंना जेवणासाठी बनविण्यास भाग पाडणारी, खरंच मी पार लाडकी मुलगी आहे. सर मला नेहमी म्हणत.., "मी माझ्या जीवनात कधीही 'आरे' ला 'कारे' केले नाही." तसे ते करणे शक्य नाही हे मलाही ठाऊक होते. त्यांची तीन मुले व एक मुलगी यांच्याशी माझे घट्ट नाते आहे. मी तर या सर्वांची 'दीदी' आहे. हल्ली तर गुरुजनांची ओळख देखील राहत नाही. मी फार भाग्यवान आहे, असे ऋषीतुल्य गुरूजन मला लाभले. सरांनी करमाळा येथील महात्मा गांधी विद्यालयात ३४ वर्षे तन-मन-धनाने समर्पित होऊन, अध्यापन केले व समाधानाने निवृत्त झाले. सन २०१९ मध्ये माझा ६१ वा वाढदिवस, मी माझ्या गुरूंच्या सानिध्यात त्यांच्या मुलाच्या घरी साजरा केला. खरंच माझे केवढे परमभाग्य ! सगळेजण त्या दिशी फार खूश होते. किती अकल्पित घटना ही आजच्या युगात ! माझ्या जीवनातील हा अमोल ठेवा आहे !

सरांना सन २०१९ व २०२१ मध्ये दोन अपघात झाले. पहिल्यावेळी ते त्यांच्या आत्मविश्वासाने तरून गेले. कोणत्याही दुखण्यामध्ये, करमाळ्याहून मला नगरला आचार्य आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये घेऊन चला, तिथे माझी काळजी डॉ.आशिष (माझा मुलगा) घेईल, हा त्यांचा अट्टाहास ! आशिषने त्यांची आजोबांसारखी काळजी घेतली. पण दुसऱ्या अपघातातून ते सावरू शकले नाहीत. त्यांना बरे वाटले म्हणून घरी नेले, परंतू पाच दिवसांनी ते सर्वांना चटका लावून गेले... ती काळरात्र होती १ नोव्हेंबर २०२१.

आदल्या दिवशी दिवसभर मी त्यांच्याकडे होते. खरंच ही सत्य घटना व दुसऱ्या दिवशी माझ्या पितृतुल्य गुरूंच्या शरीरातून प्राण पाखरू त्यांना दूर घेऊन गेले. माझ्या जीवनात एक मोठी पोकळी निर्माण करून, नियतीने डाव साधला. सर.. तुम्ही आनंदी यात्रेला गेला आहात ! जर पुन्हा पुनर्जन्म असेलतर गुरु व शिष्य हेच नाते आपण दृढ करू ! हेच माझे तुमच्यासाठी देवापुढे मागणे. देव नक्की ही आशा पूर्ण करेल ! तुमच्या प्रथम पुण्यस्मरणदिनी माझे त्रिवार वंदन !!!



**...आशा भंडारी, नगर.**

## ३४ हजार रू. किंमतीच्या
# वीजेच्या तारांची चोरी

करमाळा(सं.प्र.) : वीट ते वंजारवाडी या दोन गावामध्ये वीज वितरण कंपनीचे पोल रोवून अॅल्युमिनियमच्या तारा ओढण्याचे काम सुरू असताना रात्रीच्या वेळी चोरट्यांनी ३४ हजार ८८८ रूपयाच्या ११६ किलो तारा चोरून नेल्या आहेत. या प्रकरणी संतोष भानुदास दुधे (इले.ठेकेदार रा.पांडे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ५ ऑक्टोबर पासून वीट ते वंजारवाडी या अंतरावरील मेनलाईनच्या तारा ओढण्याचे काम सुरु होते. १६ कामगारांनी २२ दिवसात ५० पोलच्या तारा ओढून काम सुरु केले आहे. ५ ऑक्टोबरला पाऊस सुरु झाल्याने आम्ही ते काम थांबवले. ९ ऑक्टोबरला तेथे गेलो असता, १४ पोलवरील तीन ओढलेल्या तारापैकी दोन तारा ही ज्याची किंमत ३४ हजार ८८८ रू. असून त्या ११६ किलो होत्या. त्या चोरट्यांनी चोरून नेल्या आहेत. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# हद्दपार आदेशाचा भंग
## तुकाराम घोंगडे विरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : उपविभागीय अधिकारी माढा विभाग यांनी २८ सप्टेंबर २०२२ रोजी तुकाराम नामदेव घोंगडे (वय-३६, रा.बिटरगाव वांगी) याच्या विरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५६ अन्वये नगर व सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीतून एक वर्षाच्या कालावधीसाठी हद्दपार करण्याचा आदेश काढला आहे. असे असताना १८ ऑक्टोबर २०२२ ला सायंकाळी पाच वाजता कंदर हद्दीतील साई हॉटेल समोर तुकाराम नामदेव घोंगडे हा आदेशाचा भंग करून कोणतीही परवानगी नसताना सोलापूर जिल्ह्यात दिसून आला आहे. त्याला पकडण्यास पोलीस गेले असताना तो पळून गेला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल मयुर नागेश कदम यांनी फिर्याद दिली आहे. पोलीसांनी यात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.


दयानंद टेलर्स
दिपावली व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
जेन्टस् स्पेशालिस्ट


अधिकृत डिलर/विक्रेते...
नॉव्हेल, शितल शिवणयंत्रे
• शिलाई मशिन, मोटार विक्री व दुरूस्ती
• सर्व मॉडेल हजर स्टॉकमध्ये मिळतील.
संपर्क : भवानीपेठ, शिवाजी पुतळ्याजवळ, करमाळा.
दयानंद रासकर (मो.९४०३०७७५५३)/राजेश रासकर (मो.९५२७०३८५८७/९१५६१५८५८४)

आमच्या सर्व ग्राहकांना व हितचिंतकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
इथं सौंदर्य जन्म घेतं..
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
होलसेल साडी डेपो
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
दिवाळी खरेदीवर १०% डिस्काऊंट

लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186

SARTHAK GALLERY

NEEL ENTERPRISES
SOLAR PANEL'S | HOME APPLIANCES | ELECTRONIC'S & ELECTRICAL MATERIAL

सार्थक गॅलरी

आपल्या सेवेसाठी आमच्याकडे सर्व प्रकारच्या इलेक्टॉनिक,इलेक्ट्रीक,घरगुती वस्तु, सोलर उपकरणे उपलब्ध आहेत.

तरी आपण सर्वांनी एक वेळ आमच्या शोरूमला अवश्य भेट द्या.

पार्श्व असोसिऐट्स

PARSHWA ASSOCIATES

- इनकम टॅक्स रिर्टन्स्
- जी.एस.टी. रजिस्ट्रेशन अॅन्ड रिर्टन्स्
- टी.डी.एस. रिर्टन्स्
- उद्यम (उद्योग) रजिस्ट्रेशन / एम.एस.एम.इ. सर्व्हिसेस
- टॅन रजिस्ट्रेशन
- शॉपअॅक्ट
- अकाउंटींग
- फुड लायसन्स
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पार्टनर्शीप डिड फॉरमेशन
- फायनान्शियल सर्व्हिसेस

प्रोप्रा. नील मिलिंद दोशी

पत्ता :- ६९९, वेताळ पेठ, राम मंदिर जवळ, करमाळा. 9921346111 parshwassociates1@gmail.com

माऊली ज्वेलर्स

वैशिष्ट्ये

- ☑ उत्तम दर्जा व विश्वास हिच आमची ओळख.
- ☑ शासन मान्य बी.आय.एस. हॉलमार्क दागिने मिळतील.
- ☑ दागिने मोडीवर कोणतीही घट न पकडता घेतले जातील.*
- ☑ हॉलमार्क प्रमाणित दागिने ऑर्डर प्रमाणे तयार करून मिळतील.*
- ☑ दिपावली निमित सोन्याच्या दागिने खरेदी वर आकर्षक भेट वस्तू.*

* नियम व अटी लागु

गुणवत्ता व विश्वासाचे सोनेरी नाते म्हणजे माऊली ज्वेलर्स

श्री. प्रविण प्रदिप जाधव मो. ९८६०९८७०७४
श्री. प्रशांत प्रदिप जाधव मो. ९९६०४५५००७

दत्तपेठ, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापुर - ४१३२०३.

|| श्री गणेशाय नमः ||

सर्व ग्राहकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

ओम टेलिकॉम

भव्य लकी ड्रॉ

दिवाळी धमाका ऑफर

airtel Jio NOKIA realme
vivo SAMSUNG mi xiaomi oppo
SAMSUNG BAJAJ TVS

कोणत्याही स्मार्टफोन खरेदीवर ११००₹ पर्यंत हमखास भेटवस्तू कॅशबॅक

बजाज फायनान्स TVS फायनान्स सॅमसंग फायनान्स उपलब्ध.

आमच्याकडे सर्व कंपनीचे मोबाईल व नवीन सिम कार्ड

जिन मैदान समोर पुणे रोड (करमाळा)

(मो- ८७८८८९५५५०/९०२२१९२४२२

इथे व्यवहार सोबत मनेही जपले जातात एक वेळ अवश्य भेट द्या.

# करमाळा शहरात स्वच्छतेचा बोजवारा - डेंगूच्या आजाराने नागरीक त्रस्त

करमाळा (सं.प्र.): करमाळा शहरात स्वच्छतेचा बोजवारा उडाला असून, शहरात डासांचे प्रमाण वाढल्याने नागरीकांत आजारांचे प्रमाण वाढले असून, शहरात डेंगू आजाराची लागण झाली आहे. नगरपालिकेने तात्काळ औषध फवारणी करून स्वच्छतामोहिम राबवावी; अशी मागणी करमाळा शहर वासियातून होत आहे.

करमाळा नगरपरिषदेमध्ये गेल्या सहा महिन्यापेक्षा जास्त प्रशासकाची नियुक्ती आहे. त्यामुळे नगराध्यक्ष व नगरसेवक यांचे आता फारसे चालत नाही. त्यामुळे अधिकाधिक कर्मचाऱ्यांचे फावले आहे. करमाळा शहरात दररोज पाऊस पडत असल्याने सर्वत्र चिखल व दलदल झाली आहे. तसेच गटारी तुडूंब भरल्याने पाणी रस्त्यावरून वाहत आहे. तसेच दररोज कचऱ्याची विल्हेवाट होत नाही. घंटागाडी कधीतरीच दिसते. त्यामुळे कचऱ्यांचे व घाणीचे प्रमाण वाढल्याने डासांचा प्रार्दुभाव वाढला आहे. डासामुळे नागरीक हैराण झाले असून लहान मुले तापाने त्रस्त झाली आहेत. शहरातील रूग्णालयात डेंगुच्या आजाराचे अनेक रूग्ण उपचार घेत आहेत. डेंगूच्या साथीने नागरीकात घबराहटीचे वातावरण निर्माण झाले असून शहरातील आरोग्य धोक्यात आले आहे.

> सततच्या पावसामुळे किल्ला वेश येथील दक्षिणेकडील वेशीतून पाणी झिरपत असल्याने तेथून प्रवास करणे धोक्याचे झाले आहे. मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी नगरपालिकेने या परिसराची पाहणी करणे गरजेचे आहे.

शहरातील अनेक संघटनांनी नगरपालिकेला निवेदन देवून औषध फवारणीची मागणी केली आहे. शहरातील कानाडगल्ली भागातील नागरीक स्वच्छता नसल्याने संतापले आहेत. कमलादेवी रोड वरील आयसीआयसीआय बँकेसमोर सतत पाणी रस्त्यावर येत असल्याने तेथील परिसर कायम चिखलमय झाला आहे. या परिसराची पाहणी नगरपालिकेने करावी व संबंधितावर कारवाई करावी; अशी मागणी होत आहे. सकाळी कमलादेवीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना या पाण्यामुळे त्रास होत आहे. पावसामुळे शहरातील नवीन केलेले रस्तेही खड्डेमय झाले आहेत. या खड्ड्यांचीही दुरूस्ती करण्याची मागणी नागरीकातून होत आहे. एकंदरीत शहरातील आरोग्य धोक्यात आले असून याकडे नगरपालिका अधिकारी व नियुक्त प्रशासक यांनी लक्ष घालावे अन्यथा मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्याची भुमिका काही नागरीक व संघटनांनी केली आहे.

# महिला स्वयंसहायता समुहांना २ कोटी १६ लाख कर्ज वाटप





करमाळा (सं.प्र.) : म.रा.ग्रामीण जीवनोन्नती अभियान, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पं.स. अंतर्गत ग्रामीण भागातील स्वयंसहायता समुहाम र्फत तयार केलेल्या खाद्यपदार्थ, साबण, उटणे, ब्रोच, लिपस्टीक, लिपबाम, पणत्या, आकाश कंदील, केरसुणी, हॅन्डवॉश इ. विविध वस्तूंचे तालुक्यातील महिला बचत गटाच्या उत्पादनाचे प्रदर्शन नगरपरिषद आवारात आयोजित केले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन आमदार संजयमामा शिंदे यांचे हस्ते झाले. यावेळी उध्दव माळी, तहसीलदार समीर माने, गटविकास अधिकारी मनोज राऊत, मुख्याधिकारी बालाजी लोंढे, तालुका अभियान व्यवस्थापक योगेश जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बँक कर्ज मेळावाही घेण्यात आला. यात एकूण ७२ स्वयंसहायता सुमहांना १ कोटी ५३ लाख रू. कर्ज वाटप करण्यात आले. अभियान मार्फत दिला जाणारा समुदाय गुंतवणूक निधी ६३ लाख रू. जि.प.गट कोटी अंतर्गत गावातील ग्रामसंघास वाटप करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन योगेश जगताप यांनी केल तर आभर पोपट माने यांनी मानले. यावेळी बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

आमच्या सर्व ग्राहकांना व हितचिंतकांना दिपावलीच्या शुभेच्छा !

कमलाई गारमेंटस्

जेन्टस् & चिल्ड्रन वेअर





शर्ट, पॅन्ट, टी-शर्ट, अरमानी पॅन्ट मिळण्याचे एकमेव ठिकाण !

लहान मुलांचे सर्व ड्रेस मिळतील

दिवाळीच्या सर्व खरेदीवर 20% सवलत

भरपूर व्हरायटी

पत्ता : न.पा.शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : प्रसाद भोसले (८२७५२०२१८८)

फ्रेश स्टॉक

# साखर कारखान्यांनी मागील देणी द्यावी

करमाळा (सं.प्र.) : १५ ऑक्टोबरला साखर कारखाने चालू करण्यास महाराष्ट्र राज्य मंत्री समितीने परवानगी दिली आहे. साखर कारखाने गाळपास सज्ञ झाले आहेत. परंतू चालू गळीत हंगामाच्या ऊसाच्या दराची कोंडी अजून कोणी फोडली नाही. तसेच काही कारखान्याची गत हंगामातील एफआरपी अजून देणे बाकी आहे. नवीन चालू हंगाम सुरू होणार आहे तरी मागील देणी दिलेली नाहीत. जनशक्ती शेतकरी संघटना कारखाने चालू करून देणार नाही. शेतकरी बिलाच्या प्रतिक्षेत आहेत. तरी ज्यांनी देणे अद्याप बाकी आहे त्या कारखान्याने मागील देणी द्यावीत व चालू वर्षीचा ऊसाचा दर जाहीर करून कारखाने चालू करावेत. अन्यथा समस्त शेतकरी बांधव व जनशक्ती शेतकरी संघटना कारखाने चालू करून देणार नाही; असे इशारा जिल्हा उपाध्यक्ष अतुल राऊत यांनी दिला आहे.

# शेलगाव(क) येथे मेडिक्लोर बाटलीचे वाटप




करमाळा (सं.प्र.) : मोठ्या प्रमाणावर पडणाऱ्या पावसामुळे पिण्याचे पाणी खराब झाले आहे. त्यामुळे पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली शेलगाव(क) येथील ग्रामस्थांचे आरोग्य चांगले रहावे, पिण्याचे स्वच्छ व निर्जंतूक पाणी मिळावे म्हणून सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रा.पं.सदस्य व ग्रामसेवक यांनी शेलगाव(क) येथील सर्व कुटूंबांना पाण्यामध्ये टाकण्यासाठी मेडिक्लोर बाटलीचे वाटप करण्यात आले. यावेळी आरोग्य सेविका, आशा वर्कर यांनी मेडिक्लोर वापराबद्दल ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.

# पंचनामे सरसकट करून ओला दुष्काळ जाहीर : संभाजी ब्रिगेडचे निवेदन

करमाळा (सं.प्र.) : करमाळा तालुक्यात अतिवृष्टीमुळे बाधित पिकांचे पंचनामे सरसकट करून ओला दुष्काळ जाहीर करावा; अशी मागणी करमाळा तालुका संभाजी ब्रिगेडच्या वतीने नायब तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाव्दारे करण्यात आली आहे. करमाळा तालुक्यात सप्टेंबर, ऑक्टोबर या दोन महिन्यात अतिवृष्टी झाली असून, सततच्या पावसामुळे केळी, ऊस, कापूस, सोयाबीन, सुर्यफुल, कांदा, उडीद, तूर, मका इ. शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे सदर पिकांचे पंचनामे न करता शेतकऱ्यांना सरसकट ५० हजार रू. हेक्टरी मदत द्यावी; अशी मागणी करण्यात आली.



यावेळी जिल्हा उपाध्यक्ष शंकर पोळ, जिल्हा संघटक गणेश सव्वाशे, तालुका अध्यक्ष अमित घोगरे, कार्याध्यक्ष राजेश ननवरे, शहराध्यक्ष वैभव माने, कृष्णा बोराडे, अशोक आदलिंग, अजित गोसावी, अशोक अडसुळ उपस्थित होते.

घर विकणे आहे

एस.टी.कॉलनी येथील १ गुंठा जागेत ८५० स्क्वे.फुट बांधकाम व स्वतंत्र कंपाऊंड असलेले 1BHK घर योग्य किंमतीत विकणे आहे.

संपर्क : मो.9423237685, 8482862332

प्लॉट विकणे आहे

नागोबा मंदिर परिसरात डांबरीटच ४।। गुंठे एन.ए. ओपन प्लॉट(कॉर्नर) विकणे आहे

संपर्क : 9423237685

सोलापूर जिल्हा समन्वयक

करमाळा शहर व तालुकावासियांना

## दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !



युवा उद्योजक व आमचे मित्र

## श्री.निखिल प्रमोद चांदगुडे

यांची युवा सेना(शिंदे गट) सोलापूर जिल्हा समन्वयक पदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !

**शुभेच्छुक : आगरवाल परिवार, करमाळा.**



दिपावलीच्या शुभेच्छा !

सुवर्ण सुरूवात शुभ लाभ संगे..

## शुभ लाभ ज्वेलर्स

आकर्षक व विविध डिझाईनमध्ये

**सोने-चांदीचे दागिणे** मिळतील..!

भरपूर स्टॉक





जैन मंदिराशेजारी, फुलसौंदर चौक, करमाळा., जि.सोलापूर

मो.9309103500, 9890314296





॥ संत ज्ञानेश्वर प्रसन्न ॥ ॥ महादेव प्रसन्न ॥ ॥ हनुमान प्रसन्न ॥ ॥ श्री राम ॥ ॥ श्री विठ्ठल प्रसन्न ॥ ॥ संत तुकाराम प्रसन्न ॥ ॥ छ.शिवाजी महाराज ॥



आशिर्वाद



कै.भगवानराव शिंदे

आशिर्वाद



कै.बाजीराव मुरूमकर

मा.गणेश(भाऊ) चिवटे यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त

## ॥ त्रिदिनी किर्तन सोहळा ॥

**व्यासपीठ चालक : मृदंगाचार्य नानासाहेब महाराज पठाडे (पोथरे)**

मौजे बिटरगाव(श्री) व पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांना कळविण्यास आनंद होतो, की.. भगवंताच्या व साधू संतांच्या व कै.बाजीराव पाटीलबुवा मुरूमकर यांचे कृपाशिर्वादाने व हंबीरराव शंकरराव मुरूमकर (गुरूजी) यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी प्रथमच किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार, प्रवचनकार,गायक, वादक उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमास उपस्थित राहून सहभागी व्हावे ही विनंती !

| वार/दिनांक | प्रवचनकार(सायं ५ ते ६) | किर्तनकार(रात्री ९ ते ११) |
|---|---|---|
| कार्तिक शु.३ शुक्रवार २८/१०/२०२२ | ह.भ.प.मच्छिंद्र महाराज साळुंके (खडकी) |  ह.भ.प.भागवताचार्य **बाळू महाराज गिरगांवकर** शेलू, जि.परभणी |
| कार्तिक शु.४ शनिवार २९/१०/२०२२ | ह.भ.प.विलास महाराज शिंदे (पोथरे) |  ह.भ.प.विनोदाचार्य **दयानंद महाराज कोरेगावकर** कोरेगाव |



रविवार दि.३०/१०/२०२२ रोजी सकाळी ७ ते ९ नगरप्रदक्षिणा होऊन सकाळी ९.३० ते ११.३०

**ह.भ.प.विनोदाचार्य प्रकाश महाराज साठे (परभणी)**

यांचे काल्याचे किर्तन होऊन नंतर महाप्रसाद होईल.

सरपंच, ग्रा.पं.बिटरगाव श्री



डॉ.अभिजीत मुरूमकर

सौजन्य

**श्री गुरूदत्त वीट कारखाना**

इंजि.विवेक दळवी (९०६७००९६९२)

नंदकुमार दळवी (९४२१०२४५९४

आमच्याकडे ४ इंची व ६ इंची वीट योग्य दरात व उत्तम प्रतीची मिळेल.

संपर्क : करमाळा-जामखेड रोड, बिटरगाव फाटा, ता.करमाळा.

• आयोजक •

**डॉ.अभिजीत मुरूमकर (सरपंच, ग्रा.पं.बिटरगाव श्री)**

**समस्त ग्रामस्थ व भजनी मंडळी, बिटरगाव (श्री)**

# पत्रकार कट्टा येथील संगणकाची चोरी

## चार संशयित पोलीसांच्या ताब्यात



करमाळा (सं.प्र.) : करमाळा शहरातील पत्रकार संघाच्या कार्यालयात १९ ऑक्टोबरला मध्यरात्री कार्यालयाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्यांनी कार्यालयातील एलईडी टीव्हीसह संगणक आदी ४६ हजार रू. चा मुद्देमाल पळवून नेला आहे. करमाळा पोलीसांनी माहितीच्या आधारे तपास करून चार संशयितांना ४६ हजार रू. च्या मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे.

सदर चोरट्यांनी मौजमजेसाठी लागणाऱ्या पैशाकरीता चोरी केल्याचे पोलीसांना सांगितले. ताब्यात घेतलेल्या संशयितांनी यापूर्वीही चोऱ्या केल्याचे कबुल केले आहे. या प्रकरणी महेश चिवटे (पत्रकार) यांनी पोलीसात फिर्याद दिली. त्यात म्हटले आहे, की आमचे करमाळा शहरातील सर्व पत्रकार यांचे मिळून जीन मैदान येथे पत्रकार कार्यालय आहे. ते दररोज सकाळी नऊ वाजता चालू करून रात्री बंद करीत असतो. १८ ऑक्टोबर रोजी आम्ही नेहमीप्रमाणे आमचे पत्रकार कार्यालय मध्ये काम करून रात्री आमचे ऑफिस बंद केले होते. त्यानंतर १९ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ च्या सुमारास ऑफिस चालू करण्यासाठी गेलो असता आमचे ऑफिसचे शटरचे कुलूप तोडलेले दिसले. त्यावेळी मी आत मध्ये प्रवेश केला असता, ऑफिस मधील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. तेव्हा खात्री झाली की शटरचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश करून चोरी केली आहे. यामध्ये कार्यालयातील २५ हजार रू. किंमतीचा एलईडी, १० हजार रू. किंमतीचा मॉनिटर, ५ हजार रू. किंमतीचा एक सीपीओ, १ हजार रू. किंमतीचा एक किबोर्ड, ५०० रू. किंमतीचा माऊस असा एकूण ४६ हजार रू. किंमतीचा मुद्देमाल चोरीला गेला आहे.

या प्रकरणी आकाश उर्फ बाळा संजय घाडगे (वय-३२, रा.फंडगल्ली), अजय उर्फ किशोर घोडके (वय-२१, रा.सिध्दार्थनगर), रोहन नंदकुमार शिंदे (वय-२२, रा.सिध्दार्थनगर), केदार उर्फ मोन्या सुभाष कुसकर (वय-१९, रा.फंडगल्ली) आदी संशयित आरोपींची नावे आहेत. अशाच प्रकारची चोरी बागवान नगर, मेनरोडवरील जैन मंदिर, दत्त मंदिर अशा ठिकाणी घडल्या होत्या. पण चोर मिळून येत नव्हते. पुण नुकतेच पत्रकार कट्टा येथील चोरी उघडकीस आल्यानंतर याचा शोध घेण्यात आला. यावेळी काही युवक हे संशयित म्हणून ताब्यात घेण्यात आले. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. याप्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## सावडी येथून कॉलेजला आलेली

# १६ वर्षाची तरूणी बेपत्ता

करमाळा(सं.प्र.) : सावडी येथून करमाळा येथे कॉलेजला आलेली १६ वर्षाची तरूणी बेपत्ता झाली आहे. हा प्रकार १९ ऑक्टोबर रोजी करमाळा येथील कॉलेजमध्ये घडला आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी तरूणीच्या आजोबांनी करमाळा पोलीसात फिर्याद दिली. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझ्या मुलीच्या मुली माझ्याकडे शिक्षणासाठी असून माझ्या दोन्ही नाती करमाळा येथील कॉलेजला जातात. माझी नात ही दररोज सकाळी साडेनऊ वाजता एसटीने तिच्या शाळेमध्ये जात असे. सायंकाळी सहा च्या आसपास परत येत असते. १९ ऑक्टोबरला सकाळी साडेनऊ च्या सुमारास माझी नात माझे घरून करमाळा येथील महाविद्यालयात गेली होती. दुसरी नात सकाळी करमाळा येथे शाळेमध्ये गेलेली होती. मी घरीच होतो. दुसऱ्या नातीचा दुपारी अडीच्या सुमारास माझ्या मुलाच्या फोनवर फोन आला. तिची बहिण सगळीकडे शोधली पण कुठेच आढळून आली नाही. पोलीस याबाबत माहिति घेत असून अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

# चिखलठाण येथून अल्पवयीन मुलगी बेपत्ता

करमाळा (सं.प्र.) : चिखलठाण येथे नववीत शिकत असलेल्या अल्पवयीन (वय-१५ वर्षे २ महिने) मुलीस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अमिष दाखवून पळवून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी करमाळा पोलीसात फिर्याद दिली असून त्यात म्हटले आहे, की माझी मुलगी ही गावातील विद्यालयात चिखलठाण येथे नववीत शिकत आहे. मुलगा हा रिटेवाडी येथे कामास असतो. गेले चार-पाच दिवसापासून तो तेथे कामास गेला होता. १८ ऑक्टोबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास मी तसेच माझी पत्नी व मुलगी असे घरी असताना माझी मुलगी मला बाथरूमकरीता जाते म्हणून बाहेर गेली ती परत आली नाही. त्यामुळे मुलीचा इतरत्र व नातेवाईक यांचेकडे चौकशी केली तसेच तिचे मैत्रिणीकडे विचारपूस केली परंतू ती आढळून आली नाही. माझी मुलगी अल्पवयीन आहे हे माहित असताना सुध्दा तिला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अमिष दाखवून पळवून नेलेबाबत माझी खाली झाली आहे. या प्रकरणी पोलीसांनी अज्ञात व्यक्ती विरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# वकिली क्षेत्रात वेळेचा सदुपयोग केला तरच प्रगती - ॲड.बी.डी.कट्टे

करमाळा(सं.प्र.) : वकिली क्षेत्रात वेळेचा सदुपयोग करून जास्तीत जास्त अभ्यास केला तरच वकिलांची प्रगती होऊ शकते; असे मत सोलापूर येथील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.बी.डी.कट्टे यांनी केले.

करमाळा वकील संघाच्या वतीने महाराष्ट्र ॲन्ड गोवा बार कौन्सिलच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ एन.डी.रोकडे, ॲड.बी.डी.कट्टे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच टेंभूर्णी येथील शिवविचार प्रतिष्ठानने ॲड.बाबूराव हिरडे यांना सामाजिक पुरस्कार देऊन सन्मानित केले त्याबद्दल त्यांचाही करमाळा वकील संघ व करमाळा न्यायालय यांचे वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. त्यावेळी ॲड.कट्टे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यायाधीश मीना एखे या होत्या. व्यासपीठावर न्यायाधीश आर.एस.शिवरात्री, वकील संघाचे अध्यक्ष ॲड.विकास जरांडे, उपाध्यक्ष ॲड.प्रमोद जाधव, सचिव ॲड.योगेश शिंपी,ॲड.पाटील ॲड.क्षीरसागर, उपस्थित होते. पुढे बोलताना ॲड.कट्टे म्हणाले, की वकील हा कामातून शिकत असतो व त्यातून तो मोठा होतो. त्यामुळे वकिलांनी सतत कार्यरत राहिले पाहिजे. मला जो पुरस्कार मिळाला त्यात करमाळा वकील संघाच्या सदस्यांचा मोठा वाटा आहे व त्यांचे आभार मानण्यासाठी मी करमाळा येथे आलो आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन ॲड.प्रमोद जाधव यांनी केले. उपस्थितांचे आभार ॲड.अजित विघ्ने यांनी मानले. यावेळी वकील संघाचे सर्व सदस्य, कर्मचारी उपस्थित होते.

# वकील परिषदेत ज्येष्ठ विधीज्ञ एन.डी.रोकडे यांचा सत्कार

करमाळा(सं.प्र.) : येथील ज्येष्ठ विधीज्ञ एन.डी.रोकडे यांचा महाराष्ट्र गोवा बार कौन्सीलच्या झालेल्या वकील परिषदेत विधी व्यवसायातील दिग्गज विधीज्ञ म्हणून सत्कार करण्यात आला. हा सत्कार सोलापूर येथे झालेल्या एका विशेष कार्यक्रमात बार कौन्सील ऑफ इंडियाचे अध्यक्ष मिलींद थोबडे व श्री.मिश्रा यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी न्यायमुर्ती जमादार, न्या.दीपशंकर दत्ता, न्या.कर्णिक, न्या.विनय जोशी आदी उपस्थित होते.



# करमाळा तालुका राष्ट्रवादीच्या कार्यकारिणीत नवीन नियुक्त्या

करमाळा (सं.प्र.) : करमाळा तालुका राष्ट्रवादीच्या कार्यकारिणीत नवीन नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. केमचे अभिजीत तळेकर, वीटचे तेजश ढेरे व तरटगावचे रविराज घाडगे यांची तालुका उपाध्यक्ष पदी तर सागर कुर्डे यांची केम शहराध्यक्ष पदी निवड करण्यात आली. तसेच रावगावचे भाऊसाहेब करगळ, मांजरगावचे वैभव हुंबे यांची तालुका सरचिटणीस पदी तर कामोणे येथील सचिन नलवडे यांची कार्यालयीन सरचिटणीस म्हणून निवड करण्यात आली. या निवडी राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष संतोष वारे यांनी केल्या. करमाळा तालुक्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष वाढविण्यासाठी तसेच देशाचे नेते शरद पवार, अजित पवार, खा.सुप्रिया सुळे यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्नशील राहावे; असे आवाहन वारे यांनी केले.

## कानाडगल्लीत मटका घेणाऱ्या

# तिघांवर गुन्हे दाखल

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील कानाडगल्ली मटका चालविणाऱ्या तिघांवर पोलीसांनी गुन्हे दाखल केले आहे. हा प्रकार १४ ऑक्टोबरला सकाळी पावणेअकरा वाजता घडला आहे.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सोमनाथ महादेव जगताप यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की करमाळा शहरातील कानाडगल्लीत बेकायदेशीर मटका सुरू असल्याची माहिती मिळाल्यावर तेथे गेलो असता, सादिक युसूफ तांबोळी (रा.कानाडगल्ली) हा पांढऱ्या रंगाच्या स्लीपवर आकडे घेत असताना आढळून आला. त्याच्याकडून पांढऱ्या रंगाचे स्लीपचे पुस्तक, निळ्या शाईचा बॉलपेन व १८९० रूपये रोख जप्त करण्यात आले आहेत. तसेच याच गल्लीत राजेंद्र आत्माराम आहेर (रा.सुमंतनगर, करमाळा) हा पेट्रोलपंपाजवळील टपरीच्या आडोशाला बसून मटक्याचे आकडे घेत होता. त्याच्याकडूनही पांढऱ्या रंगाचे स्लीपचे पुस्तक, निळा पेन व रोख ९५० रू. जप्त केले आहेत. तसेच याच पेट्रोलपंपाशेजारी बाळासाहेब शिवदास माने (रा.कानाडगल्ली) हा ही कल्याण नावाचा मटका घेत असताना आढळून आला आहे. त्याच्याकडूनही पांढऱ्या रंगाचे पुस्तक, निळ्या शाईचा बॉलपेन व ११७० रू. जप्त करण्यात आले आहे.

या प्रकरणी पोलीसांनी प्रत्येकांवर स्वतंत्र गुन्हे दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## विवाहितेची आत्महत्या

# सासरच्या चौघाविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.) : सासरच्या लोकांच्या छळास कंटाळून विवाहितेने आत्महत्या केली आहे. हा प्रकार १२ ऑक्टोबरला रात्री नऊच्या सुमारास घडला आहे. या प्रकरणी करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. यात शरद रमेश राऊत (रा.फक्राबाद, ता.जामखेड) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझी मुलगी प्रिती हिचा विवाह ज्ञानेश्वर रामा बनकर (गोमळवाडा, ता.शिरूर कासार, जि.बीड, सध्या रा.श्रीदेवीचामाळ) यांच्याबरोबर २७ एप्रिल २०१६ रोजी झाला. त्यानंतर ज्ञानेश्वर बनकर हा एस.टी.मध्ये चालक असून त्याच्या वारंवार बदल्या होत असे आणि घरी आल्यानंतर तो तसेच त्याची आई केशर रामा बनकर, दीर आप्पा रामा बनकर व जाऊ स्वाती आप्पा बनकर हे सर्वजण तिचा छळ करत होते. या छळास कंटाळून तिने १२ ऑक्टोबरला रात्री नऊच्या सुमारास मारूती मंदिराजवळ, श्रीदेवीचामाळ येथे राहत असलेल्या घरी दोरीने गळफास लावून आत्महत्या केली आहे.

या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.


यु.एस.
बिल्डर्स अँन्ड डेव्हलपर्स
खास दसरा-दिवाळीच्या शुभमुहूर्तावर..
भविष्यातील दरवाढीचा विचार करून आजच आपल्या स्वप्नातील
रो-हाऊस बुकींग करा !
आपल्या मनातील घर सुलभ हप्त्यामध्ये
कर्ज सुविधा उपलब्ध
फ्लॅट नाही, आता मोठं घर घ्या..!
साईट : श्री कमलादेवी मंदिर जवळ, लक्ष्मीहरी नगर, एस.टी.कॉलनी शेजारी, करमाळा.
यु.एस. स्पेशल
● संपूर्ण बांधकाम वाळू व राजुरी स्टील मध्ये.
● किचनमध्ये अल्ट्रा अॅक्वा प्युरिफायर/इनव्हर्टर.
● स्वतंत्र बोअर. ● १००० लिटरची पाण्याची टाकी.
● प्रत्येकाला स्वतंत्र पार्किंग सुविधा व कंपाऊंड वॉल
● हॉल, किचन व बेड संपूर्ण पीओपी एलईडी फोकससह.
● मुख्य दरवाजा लोखंडी सेफ्टी गेटसह
● कंपाऊंडला लोखंडी गेट
या व्यतिरिक्त अजून बरेच काही..!
कलेक्टर एन.ए.प्लॉट मिळतील.
संपर्क : त्रिंबके बंधू
सोनल त्रिंबके -.09421262944, उमेश त्रिंबके-09156361844


दिवाळी निमित्त सोन्याच्या दागिने खरेदीवर सोन्याचे
कॉईन मोफत
* स्किम - ५ ग्रॅम व त्या पुढील सोन्ये खरेदीवर
दि. ३ ऑक्टोबर २०२२ ते
दि. २७ ऑक्टोबर २०२२ पर्यंत.
नियम व अटी लागू.
गोल्डन दिवाळी ऑफर
AJ Anandi Jewellers
मंगलमय सुंदरता..
अनोख्या क्षणाची..
आनंदी ज्वेलर्स
मेनरोड, जय महाराष्ट्र चौक, करमाळा
● फोन (०२१८२)२२२२०९ मो.९४२०९१५०९९